# माणूस

शनिवार । १३ नोव्हेंबर १९७६ । साठ पैसे

प्रा. सु. श्री. पांढरीपांडे यांचा
'हक्क आणि कर्तव्य'
हा चार पानी लेख
काही अपरिहार्य कारणास्तव
ऐनवेळी अंकातून गाळावा
लागला. त्यामुळे पृष्ठे १३, १४,
१५, १६ ही अंकातून फाडून
काढावी लागली. वाचकांनी
अंकातील या फाडाफाडीचा
वेगळाच काही गैरअर्थ कृपया
काढू नये ही विनंती.

## साप्ताहिक माणूस

वर्ष सोळावे – अंक चोविसावा

१३ नोव्हेंबर १९७६

मूल्य : साठ पैसे



संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


साखरनावजे गावात ४०, कुडा गावात १८, पोचाडमध्ये २० .....

# लग्नगडी–घरगड्यांची पाहणी

**काळुराम धोदडे, अध्यक्ष, भूमिसेना (कोंढाण)**

आपल्या देशातील केंद्रीय शासनाने वीस कलमी कार्यक्रम घोषित केल्याने खेड्यापाड्यांतील कष्टकरी नाडलेल्या आदिवासींच्या आशा मालवल्या आहेत. वीस कलमी कार्यक्रमाने दरिद्री व दबलेल्या आदिवासीला हायसे वाटले. वर्षानुवर्षांच्या जुलूम-जबरदस्तीतून आपण आता मुक्त होणार, असा विश्वास त्याला वाटू लागला. परंपरागत मानहानीचे व उद्ध्वस्त जीवन आता संपणार असा दिलासा त्याला मिळाला.

देशातील ठिकठिकाणच्या कार्यक्षम व समाजाभिमुख शासकीय अधिकाऱ्यांनी हा कार्यक्रम धडाडीने अंमलात आणल्याच्या बातम्या ऐकून ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यामधील आदिवासींना खूप समाधान वाटले. पण आपल्याला मात्र ह्या अंमलबजावणीच्या कामात उपेक्षेने वागविले जात आहे, याची त्याला खंत वाटत आहे. देशभर सर्वदूर माझ्या आदिवासी बांधवाना सन्मानाचे जीवन जगता यावे, यासाठी निकडीचे प्रयत्न होत असताना ठाणे जिल्ह्यातील मी मात्र अजूनही इतका उपेक्षित का, ह्या प्रश्नाने त्याला हैराण केले आहे. आणीबाणी जाहीर केल्यानंतर वर्षाहून अधिक काळ वाहून गेला तरी ह्या आदिवासींच्या जीवनात प्रकाशाचा एकही किरण का डोकावला नाही, ही व्यथा त्याला बेचैन करीत आहे. अशी आहे तरी कोणती परिस्थिती ?

पालघर तालुक्यात आदिवासींच्या विकासासाठी व सुखासाठी अविरत परिश्रम करणारी भूमिसेना ही संघटना या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी कटिबद्ध झाली. ह्या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पाड्यापाड्यांमधून पायी फिरून शेकडो आदिवासी कुटुंबांची तपशीलवार माहिती गोळा केली. या नुकत्याच गोळा केलेल्या माहितीच्या आधारे विलक्षण वेदना देणारे विदारक सत्य शासनापुढे व जनतेपुढे ठेवण्याचा नम्र प्रयत्न मी करीत आहे.

पालघर तालुक्यामधील मनोर ब्लॉकमधील एक गाव किराट. या गावच्या लहू नारायण पावडे नावाच्या सावकाराकडे राबणारा काशिनाथ लक्षा वावरे हा आदिवासी लग्नगडी. लहू पावडे सावकाराने, काशिनाथ लक्षा वावरेला १४ वर्षांपूर्वी ६० रु. रोख व रु. ४०७/७५ पैशाचे सामान घेऊन दिले होते. ह्याला कर्ज का म्हणायचे कोणास ठाऊक. कारण काशिनाथला रोख रु. ६०/– फक्त मिळाले होते. बाकी लग्नासाठी लागणाऱ्या किरकोळ वस्तूंचा खर्च सावकाराने केला हे मात्र खरे. असा खर्च तरी किती आला काशिनाथच्या लग्नाला ? त्यानेच सांगितलेली यादी पाहा : एक खंडी भात रु. २००/–, लुगडी नग ३ रु. ८५/–, पोलकी नग ३ रु. ९/–, टॉवेल नग ४ रु. १२/–, लुगडी नग २ रु. २५/–, शाल नग २ रु. २५/–, धोतर नग १ रु. ७/–, मसाला ४ किलो रु. २०/– व किरकोळ खर्च मिळून रु. ४०७/७५ पैसे. रोख व वस्तू मिळून सावकाराने काशिनाथ वावरेच्या लग्नासाठी १४ वर्षांपूर्वी रु. ४६७/७५ पैसे खर्च केला.

आदिवासी मुलाच्या लग्नाचा खर्च स्वतः करणारा हा सावकार फारच दानशूर असला पाहिजे असा मात्र कोणी समज करून घेऊ नये. कारण हे लग्न होण्यापूर्वीच सावकाराने काशिनाथशी पूर्वापार चालत आलेला करार केला होता. हे लग्न पार पडताच काशिनाथ हा केवळ पत्नीशीच बद्ध होणार नव्हता तर ही दोघे पतिपत्नी सावकाराकडे आयुष्यभर गुलामीच्या बेड्यांनी बंदिस्त होणार होती. लग्नाचा खर्च करून लग्न करून देण्यामागे सावकाराचे कपटी हेतू होते. ह्या दोघांना

कायमचे स्वतःच्या शेतावर व घरामध्ये वाटेल तितका वेळ राबवून घेण्याचा अलिखित परवाना हे लग्न होताच सावकाराला मिळणार होता. तसा तो त्याने मिळवलाही. काशिनाथ व त्याची पत्नी अजूनही सावकाराकडे रात्रंदिवस खपत आहेत. लग्नाच्या मोबदल्यात हे दोघे तरुण उमलते जीव भग्न झाले आहेत. लग्नानंतर काशिनाथला वीस अधोली (वीस किलो) भातावर व त्याच्या पत्नीला रोज एक पायली (एक किलो) भातावर राबावे लागत आहे. हे अधोलीभर भात कुटून त्याचे तांदूळ केले तर अर्धा किलोपेक्षा थोडेसेच जास्त भरतात. म्हणजे नुसता कोरडा भात खाऊन जगायचे तरी तो कुटुंबातील किती जणांना पुरणार? एक तर काम न करणाऱ्या म्हाताऱ्या आई-बापाना व लहान मुलांना उपाशी ठेवले पाहिजे. नाही तर काम करणाऱ्या तरुण नवरा-बायकोला तरी उपास काढला पाहिजे!

सावकार फक्त इतकेच करून थांबलेला नाही. त्याने गाव पोचाडा येथे लग्नगड्याला १९७० साली शासनाकडून भूमिहीन म्हणून मिळालेली पाऊण एकर जमीनही गिळंकृत करायचे ठरविले आहे. या ३/४ एकरमधील पीक गेली ६ वर्षे सावकार खात आहे. लग्नाच्या वेळी गड्याच्या बायकोला लग्नाच्या खर्चातून करून घेतलेला दागिना पण सावकाराने स्वत.कडे ठेवला आहे. सावकाराशिवाय दुसरीकडे लग्नगडी कामावर जाऊ शकत नाही. कारण लग्नाचे कर्ज त्याने फेडले नाही. ह्या कर्जावरचे-४६७/७५ रुपयांवरचे वर्षाचे २५ टक्के आकारलेले व्याजही काशिनाथला फेडावे लागणार आहे. पण हे व्याजासह कर्ज फेडण्यासाठी काशिनाथला त्याचे पुरे आयुष्य सावकाराकडे खर्च करावे लागेल आणि त्याच्या पत्नीला पण खपावे लागेल आणि कदाचित तरी देखील सावकाराचे कर्ज फिटणार नाही. किराटचा काशिनाथ वागरे हा एकच लग्नगडी नाही. गावोगावी असे शेकडो दुर्दैवी जीव जगत आहेत.

गाव नावजे येथील केशव बाळू जाधव हा लग्नगडी त्याच्या बायकोसह गेली १४ वर्षे राबत आहे. लग्नाआधी तो गोविंद वालकू पाटील याच सावकाराकडे तीन वर्षे राबला, तेव्हा कुठे सावकाराने लग्न करून दिले. परंतु लग्नानंतर सावकाराकडे २० अधोली भातावर खपला. त्याची पत्नीही रोज एक पायली भातावर खपली. त्याने गुलाम म्हणून बांधले जावे याकरिता!

केव्ह गावचा रामा मन्या घाटाळ हा असाच एक घरगडी. ता. ६-१०-७६ रोजी गणपत माधव नाईक या सावकाराने, तो आजारी पडल्याने कामावर जाऊ शकला नाही म्हणून, त्याला झोपडीत जाऊन बेदम मारल्याची तक्रार मनोर पोलीस ठाण्यात नोंदविली आहे. शिवीगाळ, अपमान, मारझोड, खोट्या केसेस-हे सावकार नेहमीच हे तंत्र वापरतात.

साखरेनावजे या गावात ४०, कुडा या गावात १८, नागझिरे गावात १४, निहे गावात १०, केव्ह या गावात १०, पोचाडा या गावात २०, तामसे गावात ७, किराट गावात ५ व धुकटण या गावात १० असे अनेक गावांतून लग्नगड्यानी माहिती-फॉर्म भरून दिले आहेत.

असे शेकडो लग्नगडी-घरगडी नाममात्र मजुरीवर सावकाराच्या शेतांवर व घरात अमर्याद कष्ट उपसीत आहेत. पण प्रश्न फक्त ह्या बंदिस्त मजुरांचाच नाही. जे सुटे मजूर आहेत त्यांची परिस्थितीसुद्धा अशीच दुःखद आहे. सर्रास सगळीकडे ह्या सुट्या शेतमजुराना दिवसभर काम केल्यावर एक पायली भात देण्यात येते. स्त्रिया व पुरुष दोघानाही केवळ एक पायली भात देऊन काम करून घेणाऱ्या शेठ-सावकारांना महाराष्ट्र शासनाने २४ मार्च १९७४ रोजी केलेला किमान वेतन कायदा अजूनही माहीत नाही असे दिसते. ज्या ठिकाणी रोजाच्या ७ तास कामाची मजुरी किमान ३ रु. दिली पाहिजे त्या ठिकाणी ७ तासांपेक्षा अधिक काम करून फक्त १ पायली भात म्हणजे ७५ पैसे (काही भागात १ पायली भाताची किंमत जास्तीत जास्त १ रु. आहे) दिली जात आहे.

बंदिस्त मजूर व किमान वेतन ह्या दोन्ही समस्या अतिशय गंभीर आहेत. देशातील उत्पादनावर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. ह्या गोष्टी शासनाच्या ध्यानात आल्यामुळेच वीस कलमी कार्यक्रमाने याबाबतच्या कायद्याना अग्रहक्क देण्यात आला आहे. आदिवासीसाठी शासनाच्या नव्या नव्या योजना, उपयोजना आता कार्यान्वित होणार आहेत. देशातील सर्वांत मागे राहिलेल्या आजवरच्या ह्या दुर्लक्षित विभागाकडे शासनाने कायदे करून लक्ष पुरविले आहे, ही गोष्ट स्वागतार्ह आहे, हे कोणी नाकारू शकणार नाही. वेठबिगारी व सावकारी पाशातून आदिवासी शेतकरी व शेतमजूर जोपर्यंत खऱ्या अर्थाने मुक्त होणार नाही तोपर्यंत त्याचे दैन्य संपणार नाही. यासाठी भूमिसेनेने ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यामधील आदिवासींची ही स्थिती पालघरचे मामलेदार श्री. शृंगारपुरे यांच्याकडे संपूर्ण माहितीसह दिली. शिवाय अनेक आदिवासींचे वैयक्तिक अर्जही केले आहेत. याखेरीज सावकाराकडे गहाण पडलेल्या, हस्तांतरित झालेल्या आदिवासींच्या जमिनीबाबतच्या प्रश्नांबाबतही भूमिसेना सरकारी अधिकाऱ्याना सतत माहिती पुरवीत आहेच. ठाणे जिल्ह्याच्या इतर तालुक्यांत हे प्रश्न कमीअधिक प्रमाणात आहेतच.

खेड्यापाड्यांतील ग्रामसेवक आदिवासींच्या ज्वलंत समस्यांकडे किती जिव्हाळ्याने पाहतात व किती तातडीने ह्या समस्या सोडवण्याला हातभार लावतात, यावर बरेचसे अवलंबून आहे.

सावकारशाही नष्ट करण्याच्या पुरोगामी धोरणांची अंमलबजावणी सावकारांच्या दमदाटीला व मिंधेपणाला बळी न पडताच केवळ होऊ शकेल, अन्यथा नाही.



## गरज आहे अस्पृश्य बांधवांचा स्वाभिमान जागा करण्याची

# अस्पृश्यता–उन्मूलन की दृढमूलन?

### भा. द. भावे

'हजारो वर्षे अस्पृश्यांना सवर्णीयांनी अंधारांत, अज्ञानात ठेवले, हजारो वर्षे अस्पृश्य बांधवांवर अत्याचार केले गेले,' ही घोषवाक्ये आम्ही आज जवळ जवळ जन्मापासून– सुमारे ५०/६० वर्षे ऐकत आलो आहोत.

घोषवाक्यांनी निर्बुद्ध जनता जागृत होते. पण त्या जनतेला निखालस प्रगतीचे मार्गावर असली घोषवाक्ये नेतातच असे नाही. किंबहुना घोषवाक्यांचा परिणाम क्वचित प्रसंगी अडथळे निर्माण करण्यात होतो.

आता, हजारो वर्षे अस्पृश्य बांधवांना इतर वर्णांच्या लोकांनी अज्ञानात ठेवले, त्यांच्यावर अत्याचार केले, यात फारसे खोटे आहे असे म्हणता येणार नाही. पण ज्यांनी अत्याचार केले व ज्यांच्यावर अत्याचार झाले त्या पिढ्या आज अस्तित्वातच नाहीत. तो जमानाच नष्ट झाला. इतिहासजमा झाला. शेकडो वर्षे हिंदूवर मुसलमानांनी अत्याचार केले, पोर्तुगीज वसाहतवाद्यांनी हिंदुसमाजावर जुलूम केला यात खोटे काय आहे? पण आता ते अत्याचार करणारे, जुलूम करणारे मुसलमानही नाहीत, पोर्तुगीज पण नाहीत व अत्याचार सोसणारे हिंदू पण जिवंत नाहीत.

आजही भारतात हिंदू आहेत व मुसलमान पण आहेत. म्हणून आजच्या मुसलमानांवर जुन्या आकसाने आजच्या हिंदूनी सूड घेणे जितके मूर्खपणाचे आहे, तितकेच आजच्या अस्पृश्य बंधूनी स्पृश्यांवर कोरडे ओढणे पण गैर आहे. गेला; तो जमाना संपला आहे. ही घोषवाक्ये आता कालबाह्य झाली आहेत.

अस्पृश्यता हा हिंदू धर्माला कलंक आहे. आजच्या युगात अस्पृश्यतेला स्थान नाही ही गोष्ट निर्विवाद आहे. हा कलंक दूर झालाच पाहिजे, नव्हे व्हावयास हवा यातही शंका असायचे कारण नाही.

पण हा कलंक दूर करायला योजिलेले मार्ग कितपत योग्य आहेत? आज स्वराज्यप्राप्तीनंतर एकोणतीस वर्षांत आपण आपले उद्दिष्ट कितपत गाठलेले आहे, याचा फेरविचार करायची संधी आता आली आहे असे वाटते व जर ते उद्दिष्ट 'ध्येया'सारखे 'न गाठता येणाऱ्या अंतरावर दूर असेल' तर चालू मार्ग दुर्बल आहेत, चुकीचे आहेत व नवीन मार्गांचा अवलंब झाला पाहिजे, यातही शंका असू नये.

व्यक्तीची व समाजाची भरभराट, प्रगती ही नेहमी त्या व्यक्तीचा व समाजाचा विकास किती झाला आहे, त्यांचा आत्मविश्वास किती वाढला आहे, त्यांची अस्मिता, स्वतःविषयीचा आदर किती प्रखर आहे, यावर होत असते. ही प्रगल्भता जेवढी लवकर येईल तेवढ्या लवकर ती व्यक्ती अगर समाज उन्नत होत असतो.

हजारो वर्षे आमचा समाज कोणत्या गर्तेत होता याचाच केवळ विचार करून आज पाऊल पुढे पडणार नाही.

–आज मी कुठे उभा आहे व मला काय साध्य करायचे आहे, याचा विचार करूनच पुढे मार्ग आक्रमता येईल. आज मला मिळणाऱ्या संधींचा मी माझ्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकासासाठी कितपत उपयोग करून घेत आहे, याचाच विचार करावयास हवा.

लहान मूल सुरुवातीस स्वतःच्या हाताने जेवू शकत नाही. त्याला कोणीतरी भरवावे लागते. पण किती दिवस? थोड्याच काळात मूल आपण होऊन स्वतःचे हाताने जेवू लागते, चालू लागते, धावू लागते, उड्या मारू लागते. जर ते लहान मूल तसे न करेल तर त्यात वैगुण्य असावे, त्यात शारीरिक अगर मानसिक दुबळेपणा असावा, असा अचूक अंदाज डॉक्टर करतात.

मागासलेला वर्ग स्वराज्याचे सुरुवातीस लहान मुलासारखा होता. त्याला काही काळ उभे राहण्यास पाऊल टाकण्यास आधार हवा होता, तो त्याला मिळाला आहे. पण हा टेकू किती दिवस द्यायचा?

अस्पृश्य अथवा मागास वर्गाची शेकडो वर्षांपूर्वी काय स्थिती होती, त्याचे आजच्या पिढीस इतिहास वाचूनच ज्ञान होणार आहे. पण तोच इतिहास असे पण सांगतो की, इंग्रजांचे राज्य आल्यावर दीडशे वर्षांत अस्पृश्यांवर कोणतीही बंदी नव्हती व इतर समाजाइतक्याच नव्हे तर काकणभर जास्तच सवलती त्यांना मिळत होत्या. इतर बऱ्याच मोठ्या समाजाने इंग्रजी शिक्षण घेतले, नोकऱ्या मिळविल्या, व्यापारधंदे केले, त्यातून शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ निर्माण झाले. पण, समोरचा दरवाजा बंद नसताना– सताड उघडा असताना काही समाज मागेच राहिले. पूर्वीचे काळी कदाचित अस्पृश्य वर्गास ब्राह्मण-क्षत्रिय या वर्गांनी त्या काळचे शिक्षण घेऊ दिले नसेल, पण ब्रिटिश आमदानीत तर त्यांचे हात कोणीही बांधलेले नव्हते. त्यांनी आपली प्रगती का केली नाही? कदाचित न्यूनगंड असल्याने केली नसेल. पण न्यूनगंड हा व्यक्तिगत दुर्गुण आहे, सामाजिक नाही. इतिहासकाळात न्यूनगंड नसलेला चोखामेळा यासारखा संतकवी होऊन गेला. मराठ्यांच्या लष्करात न्यूनगंड नसलेला रामोशी, महार यांची पथके असत व त्यांनी पराक्रमाची गाथा आपल्या रक्ताने लिहिली याला इतिहासाची साक्ष आहे. पण पुढे एक गोष्ट नक्की दिसते ती

म्हणजे आम्हास पुढे जायचे आहे, इतरांचे बरोबरीने जगायचे आहे, अशी आंतरिक इच्छाच या समाजात गेली दोनशे वर्षांत निर्माण झालेली नव्हती.

ही इच्छा निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न कोणी केले, तर एकजात इतरांनी–अस्पृश्य–मागासवर्गाच्या बाहेरच्या इसमांनी ! प्रथम इंग्रज अधिकारी, म. ज्योतिबा फुले, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी, संत गाडगे महाराज, विनोबा भावे, ठक्करबाप्पा–ही नामावळी खूप वाढविता येईल. ही सर्व नावे अस्पृश्य अगर मागासवर्गातील नव्हेत. या सर्व मंडळींना वाटले, समाजाचे एक अंग अधू राहत आहे, प्रगत होत नाही व म्हणूनच या मंडळींनी जंग जंग पछाडून सातत्याने प्रयत्न करून या समाजाचा अंतरात्मा जागृत करण्याचा प्रयत्न केला.

पण दुसरा आपला उद्धार करू शकत नाही. तो आपणास किंचित काळ फार तर मदतीचा हात देऊ शकेल. ज्याचा उद्धार त्याने स्वतःच करायचा असतो. 'उद्धरेत् आत्मानात्मानम्' हे वचन प्रसिद्धच आहे. या समाजातून स्वराज्यपूर्वकाळात अस्पृश्योद्धारासाठी जिवाचा आटापिटा करणारे किती निर्माण झाले ! स्वराज्योत्तर काळातही एखाददुसरा अपवाद वगळता, 'आम्हास किती शिष्यवृत्त्या, किती नोकऱ्या, किती बढत्या आहेत,' या आत्मकेंद्रित विचारापलीकडे या मंडळींनी काय केले आहे ?

पुढे जायचे म्हणजे दुसऱ्यास मागे खेचायचे हा रास्त व न्याय्य मार्ग नाही. दुसऱ्याहून मी जास्त क्षमता दाखवून मी त्याचे पुढे जाईन, ही विजिगिषू वृत्ती आजवर मिळालेल्या मदतीतून निर्माण झालेली नाही. अजूनही 'मला ज्या अर्थी इतरांसारखेच शिक्षण मिळाले आहे त्या अर्थी मी पण स्पर्धेत उभा राहून नोकरी मिळवीन, मी स्वतःची लायकी सिद्ध करून बढती मिळवीन,' ही जिद्द एकोणतीस वर्षांच्या सवलतीनंतरही त्या समाजात निर्माण झालेली नाही.

आता कोणी म्हणेल, हा एकोणतीस वर्षांचा कालावधी पुरेसा नाही. पण हे खोटे आहे. चीन एकोणतीस वर्षांपूर्वी अत्यंत मागासलेला देश होता. पण त्याच काळात जगाचे डोळे दिपवून टाकेल, अशी प्रचंड प्रगती त्याने केली.

खरोखर 'ज्यू' जमातीवर अक्षरशः हजारो वर्षे जो अत्याचार झाला त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. त्यांच्यावर झालेल्या अत्याचारापुढे अस्पृश्यांवर झालेला अत्याचार खिजगणतीतही घेता येणार नाही. अस्पृश्यांच्या पिढयान्‌पिढया फक्त अज्ञानात राहिल्या तर 'ज्यू'च्या पिढयान्‌पिढया कापण्यात आल्या, नष्ट करण्यात आल्या. तरी देखील जेमतेम पंचवीस वर्षांत ज्यूंचे इस्रायल हे राष्ट्र, एक छोटेसे पण बलाढ्य राष्ट्र गणले जाते. तेव्हा एकोणतीस वर्षांचा काल पुरेसा नाही, या म्हणण्यात अर्थ नाही. रशियानेसुद्धा बलाढ्य व्हावयास याहूनही बराच कमी काळ घेतला होता. एकूण काय, हा वेळ पुरेसा नाही, ही एक पोकळ–खोटी सबब आहे. किंवा अधिकाधिक सवलती पदरात पाडून घेण्यासाठी योजलेला डाव आहे.

रशिया, चीन, इस्रायलमधील लोकांनी जरूर तेव्हा मदत घेतली–पुष्कळ वेळा तर स्वतःच्या बळावर प्रतिकूल परिस्थितीला तोंड दिले. नऊ लाखांच्या वर लोक भूकंपात मृत्युमुखी पडले असताना एक पैशाचीही परकीय मदत न घेण्याचा बाणेदारपणा, ज्यांचा स्वाभिमान जागृत आहे असा 'माओ'चा चीनच दाखवू शकतो. येशू ख्रिस्त, कार्ल मार्क्स, आइन्स्टाईन ही नररत्ने छळल्या जाणाऱ्या ज्यू समाजानेच जगास दिली आहेत.

येथे मात्र, 'मी अस्पृश्य समाजातील आहे म्हणून मला शिष्यवृत्ती (मौलिक नव्हे–मदतीची) मिळालीच पाहिजे.' बरे, मिळाली. 'शाळेत फी, पुस्तके फुकट हवीतच–' ती पण दिली–तेही गरीब परिस्थितीतील मुलाला देणे आवश्यकच आहे. शाळेत तोच शिक्षक व तोच अभ्यास सगळ्यांना सारखाच शिकवतो. पण हा विद्यार्थी जेमतेम मॅट्रिक कसाबसा होतो. मग, 'मी अस्पृश्य म्हणून मला अमक्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळायलाच पाहिजे. मी मेरिटमध्ये उत्तीर्ण झालो म्हणून नाही–' दिला प्रवेश. तिथेही कसाबसा तिसऱ्या वर्गात पास झाला. परत 'मी अस्पृश्य म्हणूनच मला नोकरी पण मिळाली पाहिजे–' दिली नोकरी. पण मला कामाचे नीट आकलन होत नसले तरी मला बढती पण मिळाली पाहिजे, हा आग्रह आहेच ! !

आणखी एक भोंगळ सबब पुढे केली जाते. ती म्हणजे मागास वर्गाच्या लोकांच्या घरातून 'शैक्षणिक वातावरण' नसते म्हणून त्यांच्या उन्नतीस विलंब होतो. तथाकथित 'शैक्षणिक वातावरण' ज्यांच्या घरात असते तेथेही काही मुले निव्वळ 'ढ' निघतातच ना ! वातावरण हे आपोआप निर्माण होत नसते. ते निर्माण करावयाचे असते. एका शिक्षित अस्पृश्य अथवा मागास वर्गीयाने स्वतःच्या घरात तसे वातावरण निर्माण करून पुढच्या पिढीस स्वावलंबी करायचे असते. पण, मला माझ्या मुला-नातवांना 'शिक्षण–नोकरी–प्रमोशन' 'फुकटात मिळणार' ही खात्री असल्यावर ते वातावरण कधीच निर्माण होणार नाही. एकेकाळी ७०% चे वर निरक्षर असणाऱ्या चीनचे जनतेत कुठे 'शैक्षणिक वातावरण' होते. पण ते निर्माण केले गेलेच ना !

'कुठलीही गोष्ट स्वकर्तृत्वाने मी मिळवणार नाही. माझी जात हाच माझा वशिला, हीच माझी शिफारस व तीच माझी लायकी,–' अशा माणसाचा स्वाभिमान जागृत कसा होणार ? मला 'मिळणारच' आहे हे ठाऊक असल्यावर 'मी ते मिळवीनच' ही तीव्र इच्छा कशी उत्पन्न होणार व इच्छापूर्तीसाठी लागणारी धडपड व तपश्चर्या कुठून येणार? हे सर्व मिळत असताना प्रथमतः त्या व्यक्तीच्या व समाजाच्या स्वभिमानाचा मुद्दा पडतो. माझ्यापेक्षा अधिक बुद्धिमान, अधिक कार्यक्षम असणाऱ्या माणसाना डावलून मी विद्यालयात प्रवेश मिळविला, मी नोकरी मिळविली व अखेरीस मी नालायक असून अनेक लायक लोकांना मागे सारून मी बढती पण मिळविली–ही परिस्थिती त्या माणसाला विचारवंत, कार्यक्षम तर करीतच नाही, पण बहुधा लाज वाटावयास लावत असावी.

ज्या सवलती माणसाला स्वाभिमानशून्य, कर्तृत्वशून्य व निलाजऱ्या बनवितात, त्या सवलती चालू ठेवणे योग्य आहेत काय, याचा फेरविचार करावयास हवा.

रोजच्या व्यवहारातील उदाहरण घ्या. बाप आपल्या मुलांना पैशाअडक्याची मदत करून त्याला आपल्या पायावर उभे राहाण्यास मदत करतो. पण तो मुलगा मोठा झाल्यावर तो मुलाच्या मुलांना (नातवांना) मदत करीत नाही. ते काम नातवाच्या वडिलांचे असते. इथे, मदतीवर शिक्षण घेतलेले, सवलतीमुळे नोकरी मिळालेले-बढत्या मिळविलेले, आय्. ए. एस्.,आय. पी. एस्. अधिकारीही आम्ही अस्पृश्य आहोत, या नावाखाली निःसंकोच आपल्या मुलांसाठीही त्याच सवलती मिळवून देतात व अस्पृश्यतेतून बाहेर पडण्याऐवजी आपल्या मुलांनाही सांगतात, 'तुम्ही अस्पृश्य आहात. या सवलती घ्या.' म्हणजे काय, अस्पृश्यतेचा छाप पिढयान् पिढया पक्का करतात.

वास्तविक ज्या समाजाने त्यांना सर्व प्रकारची मदत करून मोठ्या राजमान्य अधिकारावर आणले, त्यांनी तरी आता आम्ही अस्पृश्य

नाही. आमची मुले जगाच्या धकाधकीत भाग घेऊन स्वकर्तृत्वाने पुढे येतील, ही धमक का ठेवू नये ?

घटनेत ' सर्वांना समान संधी मिळावी ' असे एक कलम आहे. मान्य आहे. मागास वर्गातील इसमाला संधी प्राप्त करून घेण्याच्या पातळीवर यायला मदत करावयास हवी. अवश्य, त्याला मदत करा. त्याच्यासाठी वेगळी ' ट्यूशन ' द्या–जसे आय्. ए. एस्. वगैरे परीक्षांसाठी चालले आहे तसे. पण त्या पातळीवर त्याला आणल्यावर त्याने कर्तबगारीनेच पद मिळवावयास हवे. तेथे अस्पृश्य म्हणून जर त्याला झुकते माप दिले तर ती ' समान संधी ' नव्हे. तो इतरांवर अन्याय असतो.

बरे, मोठ्या पदाला पोहोचल्यावर त्यांना योग्य तो मान मिळतो का ? कुठून मिळणार ! जे पद स्वपराक्रमाने मिळवायचे ते जर जातीच्या वशिल्याने मिळाले तर बाजूचे लोक त्याची हेटाळणीच करत असतात. बाजूस जाऊन करतात एवढेच. नुकतेच काही वरिष्ठ अधिकाऱ्यांशी–ते सात–आठजण होते–वार्तालाप करताना ' क्ष '–जो अस्पृश्य समाजातून सर्व सवलती घेऊन राखीव जागेतून वर आला होता–त्याचेविषयी बोलणे निघाले तर, ' त्यांचे काय बुवा! ते जन्माने अधिकारी आहेत. आम्ही कष्ट करून मिळविले. त्यांच्या पायाला जातीचे बॉलबेअरिंगचे चाक आहे आमच्या पायाला जातीची बेडी आहे. त्यांची व आमची बरोबरी कशी होणार?' असे उद्‌गार ऐकावे लागले. म्हणजे काय ? त्याला अधिकार आहे, पगार आहे, पण आदर नाही.

अस्पृश्यासाठी वेगळे छात्रगृह–म्हणजे तेथे राहणारा हा अस्पृश्य आहे हा शिक्का पक्का करायचा. त्याला अस्पृश्य म्हणून शाळा–कॉलेजात सवलतीने प्रवेश–शिक्का अधिक बळकट. त्याला त्यामुळे नोकरी म्हणजे शिक्का पक्क्या रंगाचा व त्याच्या मुलांनाही या सवलती व मुलांच्या मुलांनाही या सवलती मिळत गेल्या तर अस्पृश्यतेचा कलंक त्यांनी आपण होऊन पिढ्यान् पिढ्या टिकविला असेच नाही का होणार ! मग अस्पृश्यता नष्ट करण्याचे मार्ग आपण अवलंबितो आहोत का आपण या सवलतीपायी त्यांची अस्पृश्यता दृढमूल करीत आहोत, हा प्रश्न समोर उभा राहतो.

खुद्द अस्पृश्य वर्ग जोपर्यंत स्वत:स अस्पृश्य म्हणून सवलती मागतो, तोपर्यंत तो स्वत:स तर अस्पृश्य म्हणवून घेतोच व इतरांनाही तसे म्हणावयास भाग पाडतो. पिढ्यान् पिढ्या चालणाऱ्या सवलती त्यांना अस्पृश्यतेच्या डागापासून दूर करीतच नाहीत. अस्पृश्यासाठी वेगळे वसतिगृह, अस्पृश्यांसाठी चालविलेली शिबिरे, शाळा व आता तर चालू फॅशनप्रमाणे त्यांनी लिहिलेले वाङमय पण ' दलित–वाङमय ' म्हटले जाते. दलितांनी व सर्वांस आवडेल असे चांगले वाङमय लिहिले गेले तर ते मराठी वाङमय, राष्ट्रीय वाङमय होईल. 'दलित' राहणार नाही. एखाद्या हतबल व्यक्तीविषयी–जरी तो अस्पृश्य असला तरी–हळुवारपणे सहानुभूतीपूर्वक, अश्रू ओसंडवणारे लिखाण लिहिले गेले तर ते ' दलित वाङमय ' निश्चित होणार नाही. ते मराठी शारदेस गौरव आणील असेच वाङमय होईल.

आता वेळ अशी आली आहे की, तथाकथित अस्पृश्यांनी आपण अस्पृश्य होतो हे विसरून जावे. आपण भारतीय, किमानपक्षी महाराष्ट्रीय आहोत, याची जाणीव ठेवावी. स्वत:च्या अस्पृश्यतेच्या अंड्याचे कवच फोडून उघड्या मोकळ्या जगात यावे. स्वत:च्या सामर्थ्याने, कर्तबगारीने वेगवेगळी क्षेत्रे काबीज करावी व जनतेस पटवून द्यावे. आम्ही जे आहोत–ते एकेकाळी अस्पृश्य होतो म्हणून तसे आहोत असे नाही. तर आमचे स्थान आम्ही तपश्चर्येने, कठोर परिश्रमाने मिळविलेले आहे. सर्व समाज त्यांचा निश्चित आदर करील–गौरव करील.

चोखामेळा याला संत म्हणून सगळा महाराष्ट्र मान देतो. शौर्यचक्र मिळविणारा रामा राघोबा राणे याचा तो महार आहे अथवा बुद्ध आहे किंवा ब्राह्मण आहे अथवा मराठा आहे म्हणून त्याचा आदर करीत नाहीत. तर त्याचा शूरवीर म्हणूनच आदर करतात.

हा मागीलदाराने–वशिल्याचे तट्टू–जातीच्या जोरावर पुढे आला असे दिसले म्हणजे त्याने दुसऱ्यावर अन्याय केला आहे, असे वाटते व त्याचेविषयी अनादर निर्माण होतो. याच्यापलीकडे काहीच फळ प्राप्त होत नाही. उलट फार फार मोठ्या समाजाला आपण न कळत दुखवीत आहोत याची जाणीव त्यांना करून द्यावयास हवी. शेकडा ७०% गुण मिळविणारे शेकडो–हजारो विद्यार्थी इंजिनीअरिंग, डॉक्टरी शाखांत प्रवेश न मिळता बाजूस पडतात व केवळ ४५% गुण मिळविणारा जातीच्या जोरावर प्रवेश घेतो. क्रमांक सत्तरावर येणारा आय्. ए. एस्. मध्ये प्रवेश मिळवू शकत नाही तेथे एकशेसत्तर क्रमांकावर येणारा अधिकार प्राप्त करतो. तेव्हा नाउमेद झालेल्या, आयुष्याच्या उंबरठ्यावर असणाऱ्या तरुण पिढीच्या मनावर, ज्यांना अस्पृश्यता ही काय चीज आहे हे माहीत देखील नाही, त्यांचे मनावर–विपरीत प्रतिक्रिया झाली तर त्यात चूक कोणाची ?

महारथी कर्णाने दिलेला धडा विसरला जात आहे. पौरुषापेक्षा कुलाचे पारडे फारच जड होत आहे. ' दैवायत्तं कुले जन्म, मदायत्तम् तु पौरुषम् ' असे त्याने म्हटले. आज एक समाज कुलामुळे सर्व काही प्राप्त करून घेतो तर फार मोठा समाज पौरुष असून दुबळा पडतो. ही दुर्दशा दयनीय नव्हे का ? हेच का कर्णाने शिकविले ?

एक महाभाग बाबासाहेब आंबेडकर वगळता कुठला अस्पृश्य, ' भारतीय पुढारी ' म्हटला जातो ? जो तो केवळ एक जमातीचाच पुढारी होतो व त्याचेविषयी जे काय शक्य तेवढे करतो. अस्पृश्यांचे कार्य दुय्यम दर्जाच्या पुढाऱ्यावर सोपवून कुठलाही अस्पृश्य पुढारी मी आता केवळ एका समाजाचा उरलो नाही, सगळ्या भारताचा झालो आहे व मी सगळ्यांना समान लेखीन, अशी वृत्ती दाखवीत नाही.

लोकमान्य टिळक केवळ महाराष्ट्रीयांचे नव्हते. महात्मा गांधी गुजराथी लोकांचेच नव्हते. पंडित नेहरू फक्त उत्तरप्रदेशीय नव्हते. सुभाषचंद्र बोस बंगाली लोकांसाठीच नव्हते. ही व असली अनेक उत्तुंग व्यक्तिमत्त्वे अखिल भारतीय झाली होती. संकुचित वृत्तीतून संकुचित फायद्यावर नजर ठेवणारा एवढा मोठा होऊ शकत नाही. जेव्हा त्यातील विचारवंत आम्ही एकेकाळी अस्पृश्य होतो, ही गोष्ट विसरून आम्ही सगळ्या भारताचे आहोत व आम्हाला सगळे समान आहेत, असा विशाल दृष्टिकोन पत्करतील तेव्हाच अस्पृश्यता आपोआप इतिहासजमा होईल.

*' मला समाजाने व समाजधुरिणांनी मदत केली. धन्यवाद. मी माझ्या कुवतीप्रमाणे माझ्या पायावर उभा राहिलो. यापुढे मी* अस्पृश्य नाही. माझी मुले फक्त भारतीय आहेत. माझ्या मुलांसाठी मी अस्पृश्य म्हणवून त्यांचेसाठी मदतीची झोळी पसरणार नाही,' एवढ्या स्वाभिमानापर्यंत त्यांची झेप जाईल तेव्हा तो समाज अस्पृश्य राहू शकणार नाही. जर तो स्वाभिमान जागृत होणार नसेल तर जातीवर मदत बंद करून फक्त ' आर्थिक दृष्ट्या मागासलेला ' या कक्षेत येणाऱ्या सर्वांबरोबर त्यांनाही मदत करून तो स्वाभिमान समाजाने जागृत करावयास हवा.

नाहीतर चालले आहे त्या पद्धतीने अस्पृश्यतेचे उन्मूलन होण्याऐवजी त्याच समाजाकडून त्यांचे दृढमूलन होत आहे. अस्पृश्यता जोपासली जात आहे असेच होईल. ☐



# आंधळयांच्या देशा जावे

## श्री. मा. भावे

अभिमन्यू जागा झाला तेव्हा चांगले उजाडले होते आणि आजूबाजूचा देखावा रम्य दिसत होता. त्याच्या उजव्या हाताला आदल्या दिवशी ज्या डोंगरावरून तो कोसळला होता त्याचा उतार होता आणि डाव्या हाताला हसरी दरी ! दरीच्या मध्यावर कौलारू घरांचे वऱ्यापैकी गाव. गावाभोवती कूस होते आणि वाहेरून पाण्याचा कालवा वाहत होता. कुसाखालून कालव्याचे पाट गावात नेले होते. कुसाबाहेर कालव्याच्या काठी शेते पिकवली होती.

पण इतक्या लांबूनही लक्षात येत होती, ती घरांची चमत्कारिक ठेवण. सरळसोट रस्त्यांच्या कडेला एकमेकांना चिकटून घरे उभी होती, एवढीशी फटही कुठे दिसत नव्हती. घरे अगदी ओबडधोबड आणि त्याना मुळीच खिडक्या नाहीत. रंगही इतके विचित्र की, अभिमन्यूच्या मनात आले की, ही घरे आंधळयानीच बांधली असली पाहिजेत.

अभिमन्यू उठला आणि ठेचकाळलेले अंग घेऊन गावकुसाच्या दरवाजाजवळ आला. त्याच वेळेला दरवाजातून तीन माणसे कावडी घेऊन आली आणि कालव्यावरून कावडी भरून परत जाऊ लागली. अभिमन्यूने हाका मारल्या तेव्हा ती थावली, पण मागे वळून त्यांनी पाहिले नाही. 'आधळेच दिसतात !' अभिमन्यू स्वत:शीच म्हणाला आणि पुन्हा हाका मारू लागला. तशी कावडी खाली ठेवून ती माणसे अभिमन्यूच्या जवळ आली आणि त्याच्याकडे न पाहता उजवे कान टवकारून उभी राहिली.

अभिमन्यूने त्या माणसांना नीट निरखले. त्यांनी धोतर, बंदाची बंडी, टोपी असाच पोशाख केला होता. पण प्रत्येक कपडयाला निरनिराळया रंगांची शिवण होती. पायांतल्या वहाणांचे बंदही दोन–तीन रंगाचे होते. 'यांना रंगांची काही कल्पनाच नाही,' अभिमन्यूला वाटले, आणि आपले हे वाटणे बरोबर आहे, याची खात्री त्या माणसांच्या चेहऱ्यांकडे पाहताच पटली; कारण त्यांना मुळी डोळेच नव्हते. डोळयांच्या ठिकाणी होती आक्रसून करवंदाएवढी झालेली आणि सुरकुतलेल्या आणि केस नसलेल्या पापण्यांनी झाकलेली बुबुळे!

'माणूस–माणूसच असावा हा !' त्यांच्यापैकी एकजण म्हणाला.

'आंधळयांच्या गावा जावे । तिरळयाने पाच्छाव व्हावे ॥' लहानपणी गोंधळयांच्या गाण्यांतून ऐकलेल्या ओळी अभिमन्यूच्या मनात घुमल्या आणि आत्मविश्वासाने तो पुढे झाला. मघाशी जो माणूस बोलला होता त्याला त्याने रामराम केला.

'याकूब, कुठून आला रे हा ?' तिघांपैकी एकाने अभिमन्यू ज्या माणसाशी बोलत होता त्याला विचारले. 'त्या खडकातून आलेला असावा.' याकूब उत्तरला.

'मी या पर्वतापलीकडच्या देशातून आलो–तिथे माणसांना दिसते. मी ठठ्ठा गावाहून आलो आहे. मोठे गाव आहे ते–लाख–दीड लाख वस्तीचे–दृष्टी पोचत नाही इतके पसरलेले.'

'दृष्टी ?' याकूब पुटपुटला, 'दृष्टी ?'

'हा नक्कीच खडकातून आलाय्.' दुसरा आंधळा म्हणाला.

इतक्यात हात लांबवून ते तिघेही पुढे झाले. अभिमन्यू दचकून मागे सरकला. 'इकडे ये,' असे दरडावत तिसऱ्या आंधळयाने अभिमन्यूचा दंड अचूक पकडला. मग ते तिघेही अभिमन्यूला चाचपून पाहू लागले.

'अरे,' अभिमन्यू ओरडला, कारण एका आंधळयाचे बोट त्याच्या डोळयात गेले होते. तिघांनाही डोळयाचे आश्चर्य वाटले आणि ते डोळा पुन्हा पुन्हा दाबू लागले.

'चमत्कारिक प्राणी आहे, जमाल,' याकूब म्हणाला. 'केस तरी कसे म्हशीच्या केसासारखे राठ आहेत !'

'खडकांसारखाच ओबडधोबड आहे हा.' अभिमन्यूच्या दाढीच्या खुटांवरून आपला मऊ हात फिरवीत जमाल म्हणाला. 'कदाचित होईलही आपल्यासारखा गुळगुळीत.'

ही चाचपणी न आवडून अभिमन्यू जरा मागे सरकला, तोच त्यांनी आपली पकड आणखी घट्ट केली. 'हां, जरा जपून,' अभिमन्यू म्हणाला.

'हा बोलू शकतो, नक्कीच माणूस आहे.' 'उं.' याकूबने अभिमन्यूच्या घोगडीच्या खरखरीतपणावर नापसंती व्यक्त केली.

'आणि तू माणसांत कसा आलास.' त्याला जंगली जनावरांत

ढकलीत याकूबने विचारले.

'मी माणसांत नाही आलो, माणसांतून बाहेर आलो आहे. या गगनभेदी पर्वतांच्यापलीकडे आमचा विस्तीर्ण, समुद्रापर्यंत पसरलेला देश आहे.'

त्याच्या बोलण्याकडे अजीबात लक्ष न देता जमाल म्हणाला, 'आमच्या बापजाद्यांनी आम्हाला सांगितले आहे की, उष्णता, दमटपणा आणि कुजलेल्या वस्तूंतून निसर्ग माणसे बनवितो.'

'आपण त्याला पंचायतीसमोर नेऊ.' याकूब म्हणाला.

'आधी ओरडून सगळ्यांना सावध कर.' जमाल म्हणाला, 'नाही तर पोरे घाबरायची. विलक्षणच प्राणी आहे हा!'

त्यांनी आरोळ्या ठोकल्या आणि याकूबने अभिमन्यूचा हात धरला. हिसडा मारून हात सोडवून घेत अभिमन्यू म्हणाला, 'हात धरायची गरज नाही; मला दिसते.' 'दिसते, दिसते!' याकूब फिस्कारला. 'हो, हो, दिसते!' अभिमन्यू रागावून म्हणाला. रागाच्या भरात त्याचा झोक गेला आणि जमालच्या कावडीला त्याचा धक्का बसला.

'हा सुधारलेला नसावा. निरर्थक शब्द काय वापरतो आणि साधा तोलसुद्धा त्याला सावरता येत नाही.' बरोबरचा तिसरा आंधळा म्हणाला, 'याकूब, याला धरूनच नेलेले बरे!'

अभिमन्यूने विचार केला की, सध्या या आंधळ्यांच्या कलानेच घेतलेले बरे. त्यांना दृष्टीची काहीच कल्पना नाही. काही दिवसांनी दाखवूच आपला प्रताप!

त्याला दिसले की, आपल्यासाठी पुष्कळच लोक रस्त्यात जमा होत आहेत. मुला-माणसांचा आणि बायकांचा एक घोळका त्याच्या मागोमाग चालत होता. प्रत्येकजण त्याला चाचपायचा, त्याचा वास घ्यायचा आणि तो बोलत असलेला प्रत्येक शब्द काळजीपूर्वक ऐकावयाचा. काही बायका-मुले मात्र बिचकून त्याच्यापासून दूर राहत होती. तसे घाबरण्याजोगे आपल्यात काय आहे, हे अभिमन्यूला कळेना. पण मागून त्याच्या लक्षात आले की, त्याचा आवाज इतरांच्या मानाने फारच कर्कश होता. आणि त्या आंधळ्यांच्या देशात गोड आवाज हे सौंदर्य-सर्वस्व होते. याकूब आणि जमाल त्याच्या दोन्ही बाजूंनी चालत होते आणि मोठ्याने ओरडत होते, 'खडकाळ भागातील माणूस!'

'ठठ्ठा!' अभिमन्यू म्हणाला, 'ठठ्ठ्याहून आलो आहे मी.'

'रानटी माणूस आहे! रानटी,' याकूब म्हणाला. 'ऐकलेत ना काय म्हणाला ते–ठठ्ठा...हाहाहा! काय पण शब्द! नुकता कोठे बोलू लागलेला असावा.'

'ठठ्ठा' एक मुलगा चेष्टेने म्हणाला, तेवढ्यात त्याने अभिमन्यूचे बोट पिळले.

'हो, ठठ्ठा, मोठे शहर आहे; तुमच्या गावासारखे खेडे नाही.' अभिमन्यू चिडून म्हणाला.

'याचं नाव आपण ठठ्ठाच ठेवू या.'

'हा अडखळत चालतो; आणि काय कर्कश आवाज आहे.'

'चला, याला चावडीवर नेऊ या, पंचांकडे.'

त्यांनी त्याला एकदम एका दारातून आत ढकलले. तिथे मिट्ट काळोख होता. पाठीमागून माणसं ढकलीत होती. काही दिसत नव्हते, त्यामुळे अभिमन्यू अचानक एका म्हाताऱ्या पंचाच्या अंगावर पडला. त्याबरोबर आसपासच्या प्रत्येकाने त्याला थपडा मारून पुरा चीत केला.

'इथे अंधार आहे, काही दिसत नाही; त्यामुळे खाली पडलो मी.'

'नुकता कोठे माणसात आला आहे हा; नीट चालता येत नाही आणि लहान मुलासारखे निरर्थक शब्द टाकतो बोलताना.'

'आता उठू का मी? पुन्हा नाही कुणाशी धक्काबुक्की करणार.'

त्यांनी त्याला उठून बसायची परवानगी दिली. मग सगळ्यात म्हाताऱ्या पंचाने उपदेशाचे प्रवचन झोडून त्याचा पिट्टा पाडला. त्या बोलण्यावरून अभिमन्यूला कळून चुकले की, दृष्टीचे जगच यांना माहीत नाही. पूर्वी केव्हा तरी इथल्या माणसांना डोळे होते आणि जुन्या गाण्यांतून तसे उल्लेखही येत. पण नंतरच्या आंधळ्या विद्वानांनी आपल्या पूर्वजांच्या अकलेचे हे तारे खोडून काढले. आता दृष्टीविषयक गोष्टींना त्यांच्या कल्पनेतही थारा नव्हता. त्याच्या जागी श्रवण, रुची, स्पर्श आणि वास यांच्या संबंधीच्या कल्पनाच विस्तार पावल्या होत्या. अभिमन्यूची अपेक्षा होती की, आपली दृष्टी, आपले मूळचे जग यांच्याविषयी या आंधळ्यांना आश्चर्ययुक्त आदर वाटेल, ती अपेक्षा खोटी ठरली.

म्हाताऱ्याने सांगितले की, दर बारा तासांनी थंड आणि उष्ण वेळा येतात. थंड वेळ–म्हणजे रात्र–काम करण्यासाठी असते तर गरम वेळी–म्हणजे दिवसा माणसे झोपतात. आता तू आलास म्हणून, नाहीतर सगळे झोपलेलेच असायचे. 'पोरा', म्हातारा पुढे म्हणाला, 'आमच्याकडून शहाणपण शिकायला मिळावे म्हणूनच देवाने तुला इकडे पाठवले. अजून तुला खूप शिकायचे आहे. चालताना तू अडखळतोस असे जमाल म्हणाला. बोलताना काही तरीच भरकटतोस हे आम्ही ऐकलेच आहे. पण सुधारशील. शहाण्यासारखा राहा. वाईट सवयी टाकून दे. सुधारशील.'

त्याला थोडे दूध आणि भाकरी खायला देऊन सगळी माणसे झोपायला गेली. अभिमन्यूला अर्थातच झोप आली नाही. तो म्हाताऱ्याचे बोलणे आठवून स्वतःशीच हसत आणि विचार करत पडला होता. पुन्हा पुन्हा त्याला वाटत होते की, आपल्या दृष्टीच्या सामर्थ्यावर आपण या लोकांना वाकवू शकू. 'आंधळ्याच्या गावा जावे। तिरळ्याने पाच्छाव व्हावे॥' ही ओळ सारखी त्याच्या मनात घोळत होती.

एवढ्यात संध्याकाळ झाली. सौम्य पिवळ्या प्रकाशाने सारी दरी भरून गेली. डोंगरावरून पडणाऱ्या धबधब्यावर शतशः इंद्रधनुष्ये उमटली. हिरवी कुरणे आणि खुललेली शेते संधिप्रकाशात झपाट्याने हरवून जाऊ लागली. एकाएकी अनिवार भावनांचा लोंढा त्याला घेरून टाकू लागला आणि आपल्याला दृष्टी देणाऱ्या परमेश्वराच्या कृपेची महती त्याला पटली.

'ठठ्ठा, इकडे येरे!'

अभिमन्यू जागीच उभा राहिला. शोधू दे त्यांना, आपण स्वस्थ उभे राहिलो तर नक्की सापडणार नाही.

'ठठ्ठा, जागचा हालत कारे नाहीस?' आवाज जवळ आला.

अभिमन्यू आवाज न करता हसला आणि दोन चोरटी पावले त्याने विरुद्ध दिशेला टाकली.

'हां, गवतात जाऊ नको; ते चालणार नाही!' दटावणी मिळाली. अभिमन्यू आश्चर्याने स्तंभितच झाला. पायाखाली दबल्या गेलेल्या गवताचा आवाज त्याचा त्यालाही ऐकू आला नव्हता.

बोलणारा माणूस पायवाटेवर आला आणि म्हणाला, 'हा इथे आहे मी.'

'मी बोलावले तेव्हा आला का नाहीस? लहान मुलाचे बोट धरून त्याला न्यावे लागते तसे तुझे करायचे की काय? चालताना रस्ता वाजलेला ऐकू येत नाही तुला?'

'मी रस्ता ऐकत नाही, पाहतो.' 'पाहतो'वर जोर देऊन अभिमन्यू उतरला.

''पाहतो' असा मुळी शब्दच भाषेत नाही. वेडेवाकडे शब्द वापरण्याचा मूर्खपणा सोडून दे आणि माझी पैरवी ऐकत मागोमाग ये.'

अभिमन्यू चिडला. 'ठीक आहे, मलाही संधी मिळेलच, परतफेड करण्याची.'

'अरे, शिकशील हळूहळू. किती तरी शिकायचंय् तुला.'

'अहो शहाणे, हे माहीत नाही वाटते तुम्हाला 'आंधळ्यांच्या गावा जावे। तिरळ्याने पाच्छाव व्हावे ॥''

''आंधळा' म्हणजे काय?'

'अभिमन्यूला वाटत होते की, केव्हा ना केव्हा तरी आपल्या दृष्टीचे महत्त्व या आंधळ्यांना समजेल आणि आपले वर्चस्व ते लोक मानतील. पण आठवडा गेला तरी आपले सामर्थ्य पटवून देण्याची संधी अभिमन्यूला मिळेना.

त्याने हे दिवस अगदी मिळून-मिसळून काढले. रात्रीचे काम करणे त्याला बरेच जड गेले आणि त्याची दादागिरी मातली गेल्यानंतर कधीही रात्री काम करायचे नाही असे तो स्वतःलाच बजावीत गेला. त्या आंधळ्यांनी ज्या सोयी आणि नियम केले होते त्यामुळे त्याला त्यांचे कौतुकही वाटू लागले.

ही माणसे माफक पण नियमित काम करीत, माफक आणि ठरीव चैन व आनंद करीत; गाण्या-बजावण्यात वेळ घालवीत; प्रेम करीत आणि मुला-बाळांची वात्सल्याने जोपासनाही करीत. आपल्याला दिसत नाही याची जाणीवच नसल्याने प्रत्येक काम ते रेखीव आणि आत्मविश्वासाने करीत. गावातील रस्ते अगदी रेखीव आणि रस्त्यात मुळीच अडथळे नसत. कोण कुठे केव्हा असायचा हे ठरलेले होते.

डोळ्यांची कमतरता इतर इंद्रियांवाटे त्यांनी शक्य तितकी भरून काढली होती. हातवारे आणि हावभाव यांच्या जागी ते बोलताना आवाजात चढउतार करीत आणि ऐकणाऱ्यांचे कानही इतके तीक्ष्ण असत की, बारक्याशा हालचालीचा पत्ताही लागल्याखेरीज राहत नसे. वासावरून, कुत्र्यासारखेच, ते माणसे ओळखत. म्हणूनच आपल्यापेक्षा अभिमन्यूत काही अधिक सामर्थ्य आहे, हे त्यांना समजणे कठीण झाले होते. याचे प्रत्यंतर दोन-तीनदा अभिमन्यूला आले.

एकदा दोघे-तिघेजण त्याचे म्हणणे मोकळ्या मनाने ऐकून घेण्यास तयार झाले. खाली मान घालून, त्याच्याकडे टवकारलेल्या कानाची टोके करून ते बसले. अभिमन्यूने त्यांना डोंगर-दऱ्यांचे सौंदर्य, आकाशातील चंद्र, सूर्य, ढग आणि तारे, पक्षी, फुले आणि झाडे यांची माहिती सांगितली. पण कितीही पटवून देण्याचा प्रयत्न केला तरी अभिमन्यू सांगत असलेल्या गोष्टी पाखंडी आहेत आणि त्या गोष्टी ऐकणे हे सैतानी कृत्य आहे ही समजूत सोडण्यास ती मंडळी तयार होईनात.

एकदा असेच दोघे-चौघे बसले असताना जवळच्याच १७ क्रमांकाच्या रस्त्यावरून याकूब येताना अभिमन्यूला दिसला. 'तो पाहा १७ नंबरच्या रस्त्यावरून याकूब इकडे येत आहे,' अभिमन्यू म्हणाला. 'आता याकूब १७ रस्त्यावर असायचे काहीच कारण नाही,' एकजण म्हणाला आणि झालेही तसेच. हे सर्वजण बसले होते तिथे याकूब आला तर नाहीच पण पुढे जेव्हा अभिमन्यूने रुजवात घालण्याचा प्रयत्न केला तेव्हा अभिमन्यूचा पाणउतारा केल्याखेरीज याकूब राहिला नाही.

अभिमन्यूची कुचंबणा वाढतच गेली. कित्येकदा त्याच्या मनात येई की कुऱ्हाडीचे घाव घालून एक-दोघांना जमिनीवर लोळवावे. एकदा त्याने घाव घालण्यासाठी कुऱ्हाड उचलली देखील! पण त्याचा धीरच झाला नाही. एखाद्या आंधळ्यावर आपण कुऱ्हाड चालवावी याची शरम त्याला वाटली आणि त्याच वेळी त्याच्या ध्यानात आले की, आपण कुऱ्हाड उचलली आहे याची जाणीव आसपासच्या आंधळ्यांना झाली आहे. 'कुऱ्हाड खाली टाक.' एकजण म्हणाला. क्षणभर तसे करावे असे अभिमन्यूलाही वाटले. पण ते त्याच्या हातून झाले नाही. तो पळत सुटला.

थोड्या वेळाने दम खाण्यासाठी रस्त्याच्या कडेला थांबला असता त्याला दिसले की लाठ्या, काठ्या, कुऱ्हाडी न् फावडी घेऊन, त्याला वेढण्यासाठी माणसे निरनिराळ्या दिशांनी गोळा होत आहेत. थोड्याच वेळात ते त्याच्या भोवती जमा झाले आणि त्याच्या हालचाली लक्षपूर्वक ऐकू लागले. अभिमन्यूही सावध होऊन आणि कुऱ्हाड हातात घट्ट धरून उभा राहिला. 'वेळ आली तर मुडदे पाडल्याखेरीज राहणार नाही.' तो स्वतःलाच बजावीत होता. 'ऐकलंत, मी मला वाटेल तसं इथं वागणार! मला पाहिजे ते करणार!' तो मोठ्याने म्हणाला.

ती माणसं त्याचा माग घेऊ लागली. 'पकडा, पकडा त्या ठगाला.' असे ओरडत ती अभिमन्यूला गाठण्याच्या प्रयत्न करू लागली. 'मूर्खांनो, तुम्ही आंधळे आहात आणि मला दिसतं! माझ्या वाटेला जाल तर याद राखा! मुडदा पाडीन.' अभिमन्यू ओरडला. 'ठगा, कुऱ्हाड खाली ठेव आणि गवत तुडवू नकोस.' एखाद्या लहान मुलाला दटवावे तसे कोणीतरी दटावले.

पण अभिमन्यू आता स्वतःला आवरू शकत नव्हता. त्याला पकडण्यासाठी येणाऱ्यांपैकी एका माणसाला कुऱ्हाडीच्या तुंब्याचा घाव घालून त्याने लोळवले आणि तो धावत सुटला. तो आता घाबरलाही होता. लपतछपत तो आडवातिडवा पळाला आणि गावाच्या कुसाच्या बाहेर गेला. डोंगराच्या गुहेत जाऊन लपून बसला...

...आणि दोनच दिवसांनी भुकेजलेला, काळवंडलेला अभिमन्यू परत आला. त्याने या दोन दिवसांत खूप विचार केला होता. 'आंधळ्यांच्या देशा जावे। तिरळ्याने राजा व्हावे॥' या ओळीही अनेकवार घोकल्या होत्या. पण आपल्या अडचणींतून कशी सुटका

करून घ्यावी याचा उलगडा त्याला झाला नव्हता. त्या आंधळ्यांशी लढणे शक्य नव्हते; कारण त्याच्याजवळ काहीच हत्यार नव्हते. एखाद्याचा खून करून इतरांना भीती दाखवून त्याला आपली हुकूमशाही कदाचित गाजविता आली असती. पण आंधळ्याला मारणे ही कल्पनाच त्याला कशीशी वाटे. शिवाय, त्याने एखाद्याचा खून केल्यानंतर तो झोपलेला असता इतरांनी त्याला नक्कीच मारले असते.

रानातच फळे-कंदमुळे खाऊन राहावे असेही त्याला वाटले. पण दोन-तीनदा फळे खाल्ल्यानंतर त्याला त्याचा वीट आला. नंतर रात्रीच्या अंधारात आणि भयाण एकांतात त्याला अचानक भीती वाटू लागली. अंगात हुडहुडी भरली. खुरडत खुरडत तो वेशीपाशी आला आणि तिथल्या आंधळ्यांना म्हणाला, 'मला काय तेव्हा सणक आली होती कोण जाणे; पण आता मला पश्चात्ताप होतो आहे. मला तुमच्यात घ्या.' तो स्फुंदून रडू लागला.

आंधळे म्हणाले, 'लेकरा, रडू नको. वेड गेलं ना तुझं? आपल्याला दिसतं अशी वेडी समजूत नाही ना तुझी?' 'नाही, नाही, वेडाची लहरच होती ती!'... आता अभिमन्यू ओक्साबोक्शी रडायला लागला... 'भाकरी... भाकरी द्या मला आधी.'

अभिमन्यूला वाटलं होतं की आपल्याला फाशी देतील, निदान अनेक वर्षं तुरुंगात ठेवतील. पण तसं काही झालं नाही. त्या आंधळ्यांना अभिमन्यूचे बंड म्हणजे त्याच्या मूर्खपणाचा आणि मागासलेपणाचा एक भाग वाटला. त्यांनी त्याला चांगला चोप दिला आणि मग हमालीची कामं सांगण्यास सुरुवात केली. थोड्याच दिवसांत अभिमन्यू त्या लोकात पूर्णपणे मिसळून गेला.

त्यानंतर अनेक दिवस गेले आणि त्याच्या मालकाची मुलगी साकिना आणि तो यांच्यांत जवळीक निर्माण होऊ लागली. साकिना शिडशिडीत होती. त्यामुळे तिच्या शरीराचा स्पर्श मऊ वाटत नसे. त्याचप्रमाणे तिचा आवाजही घोगरा होता. सर्वजण तिला कुरूपच समजत असत. पण अभिमन्यूच्या मताने ती सुंदरच होती. तिचा वर्ण तजेलदार होता, नाक सरळ आणि टोकदार होते, डोळे इतरांच्या डोळ्याइतके आक्रसलेले नव्हते. तिच्या बंद डोळ्याकडे पाहिल्यावर वाटे की, मधुर तान ऐकण्याच्या आनंदात मिटलेले हे डोळे ती आता उघडेल!

अभिमन्यू साकिनाकडे आकर्षिला गेला. तो तिच्याशी बोलण्याची, तिच्याबरोबर काम करण्याची जास्तीत जास्त संधी मिळावी असे प्रयत्न करू लागला. आपली धडपड साकिनाच्या लक्षात येत आहे आणि त्याविषयी तिला कौतुकही वाटत आहे, असे त्याच्या ध्यानात आले. अखेर दोघांनीही लग्नासाठी साकिनाच्या वडिलाची-रहिमानची-संमती मिळविण्याचे ठरले.

मुलीच्या लग्नाला रहिमानचाही फारसा विरोध नव्हता. आपल्या कुरूप मुलीचे लग्न कसे होणार याची खरं म्हणजे त्याला काळजीच वाटत होती. पण गावच्या पंचांनी मात्र लग्नाला कसून विरोध केला. एक म्हातारा पंच साकिनाला म्हणाला, 'पोरी, तो येडपट काय आवडला तुला? त्याला झटके येतात. तो बरा होणारा नाही.' 'पण तो सुधारतोय. तो किती ताकदवान आहे, आणि तरी किती हळव्या मनाचा आहे. शिवाय, माझं त्याच्यावर आणि त्याचं माझ्यावर प्रेम आहे.'

शेवटी एक पंच म्हणाला, 'आपण ठठ्ठाला डॉक्टरांकडे नेऊ. बघू, डॉक्टर काय म्हणतात ते.' एका नावाजलेल्या डॉक्टरांकडे अभिमन्यूला नेण्यात आले. रहिमान आणि साकिना यांना एका बाजूला घेऊन डॉक्टर म्हणाले, 'ठठ्ठाच्या डोक्यात काही मोठासा बिघाड आहे, असे मला वाटत नाही. याचे डोळे सुजलेले आहेत आणि ते हलतात. त्यामुळे त्याच्या डोक्यात वेडाच्या लहरी येतात. बारकेसे ऑपरेशन करून हे डोळे काढून टाकले, की तो पुरा शहाणा होईल. ऑपरेशनही काही धोक्याचे किंवा खर्चाचे आहे, असे नाही. तेव्हा, तुम्ही त्याला ऑपरेशनसाठी तयार मात्र केले पाहिजे.'

परत आल्यावर साकिनाने अभिमन्यूजवळ तो विषय काढला. पण अभिमन्यूने ती गोष्ट तात्काळ झिडकारून टाकली. 'मी आंधळा होऊन तुझा झालो तर ते तुलाच कसे वाटेल?' तो म्हणाला. साकिनाने मान फिरवली. 'माझं जग म्हणजे माझी दृष्टी.' साकिनाने आणखी मान वाकवली. 'जगात इतक्या सुंदर गोष्टी आहेत. फुले, फुलपाखरे, मऊ आणि हलकी पिसे, उंचावर पसरलेली निळाई आणि त्यात विखुरलेले ढग, बुडणाऱ्या सूर्याची लाली आणि तारकांची चमचम! आणि तुझं सौंदर्य! केवळ तुझे सौदर्य पाहण्यासाठी तरी दृष्टी हवी! तुझा गोड आणि शांत चेहरा, रसरशीत ओठ, तुझे गोंडस हात... अग, मला दृष्टी होती म्हणून तू मला आवडू शकलीस; आणि तेच डोळे तो मूर्ख डॉक्टर काढणार? तसे झाले म्हणजे तुझे सौंदर्य केवळ स्पर्शातून आणि आवाजावरून मला अजमावावे लागणार. दगडाधोंड्यांच्या आणि अंधाराने भरलेल्या कोठडीत बंदिस्त होणार... नाही, नाही. तू मला असे करायला लावणार नाहीस!'

'मला कधी कधी वाटतं...' ती हुंदका आवरत म्हणाली.

'काय?'

'मला कधी कधी वाटते की, तू असे बोलू नयेस.'

'असे म्हणजे कसे!'

'मला माहीत आहे की, तुझी कल्पना विलक्षण आहे. त्याचेच तर मला प्रेम वाटतं... पण.'

'पण...?' एक शिरशिरी आल्यासारखं तो म्हणाला.

ती स्वस्थच बसली.

'तुला काय वाटतं की मी...' त्याला स्वतःची आणि त्याहूनही साकिनाची कीव आली.

'राणी...' तो आवेगाने म्हणाला. तिला जे म्हणायचे होते पण म्हणण्याचा धीर होत नव्हता ते सगळे तिच्या विवर्ण चेहऱ्यात त्याने वाचले होते.

'मी करून घेऊ ऑपरेशन?'

'कसं कसं रे होणार आपलं?' रडत रडत साकिना म्हणाली.

'उद्या... उद्यापासून मला दिसेनासं होणार.'

'माझ्या राजा!' त्याचे हात हलकेच दाबत ती म्हणाली.

'तुला अगदी काही सुद्धा त्रास होणार नाही. माझ्या जीवा, माझ्यासाठी सोसणार ना रे तू हे सगळे...'

अभिमन्यू घरातून बाहेर पडला आणि एका कुरणाच्या कोपऱ्यात

## सोलकढी

### □ प्रगतीवाचून गत्यंतर नाही

एक पाश्चात्य पत्रकार सोडले तर, भारतात इथून तिथून सगळीकडे नुसती प्रगतीच्या प्रगती चालली आहे हे कोणाच्याही सहज लक्षात येते. आपण कोठे होतो, कोठे आहोत आणि कोठे पोचणारोत, हे पाहताना दृष्टी दोन डोळयांच्या खोवणीत नीटपणे ठेवणे मोठे कठीण होऊन बसते. याचे कारण काय असावे बरे? कोणी म्हणतात, हा ईश्वरी संकेत आहे. कोणी म्हणतात, भूतकाळ दिव्य असलेल्यांचा भविष्यकाळ रम्य असतो. कोणी म्हणतात, हा भारतीय मातीचाच गुण आहे. कोणी म्हणतात, हे श्रेय राज्यकर्त्यांचे आहे. कोणी म्हणतात असा तसा पण ह्यात विरोधी पक्षांचा हात आहे. कोणी म्हणतात, जुन्या राग्रवळ अथवा नव्या कलमी लोकशाही व्यवस्थेमुळे हे शक्य झाले आहे. कोणी म्हणतात, भारतीय माणसांची उलटचा पावलांनी चालण्याची सवयच त्यांना असे पुढे पुढे नेते आहे. मला मात्र असे नम्रपणाने पण निखालस वाटते की, आपली जी अशी दहा अधिक दोन अधिक तीन प्रगती चालली आहे ती प्रायोगिक शिक्षणशास्त्रामुळे चालली आहे.

आपल्याकडच्या शिक्षणशास्त्रात आणि पद्धतीत इतके बेमालूम प्रयोग चालले आहेत की त्यातले कालचे कोठले, आजचे कोठले, उद्याचे कोठले, परवाचे कोठले हे ओळखणे नामुमकिन झाले आहे. त्यांचा प्रत्यक्ष आणि परोक्ष अनुभव सगळयांनाच असल्यामुळे त्यांचे वक्तृत्वपूर्ण वर्णन करायची रामजोशीश मी करत नाही. मी फक्त एका नव्याकोऱ्या-फटफटीत प्रयोगाची माहिती देण्यासाठी बॉलपेन कागदाला लावले आहे.

डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी नावाची एक टोपपदवी असते. ती पदवी मिळवायची म्हणजे बारीक, वस्त्रगाळ संशोधन करावे लागते. त्यासाठी एक अधिकृत मार्गदर्शक गुरू करावा लागतो. सगळे संशोधन एकत्र करून प्रबंधावे लागते. प्रबंधासाठी विशिष्ट जाडीचा, रंगाचा, आकारमानाचा कागद वापरावा लागतो. वर संशोधनविषयाचे आणि संशोधकाचे नाव सुवर्णाक्षरात कोरावे लागते. प्रबंधाच्या तीन अधिक टंकलिखित प्रती कराव्या लागतात. त्या प्रत्येक प्रतीत तळटीपांची लेलयलूट करावी लागते. या प्रती तीट लावून परीक्षकाच्या स्वाधीन कराव्या लागतात. मग परीक्षक वेळात वेळ काढून (याला कधी कधी दहा-पंधरा वर्षेसुद्धा लागतात) वरच्या मजकुरासुद्धा तळटीपा वाचतो आणि संशोधकाची त्या टोपपदवीसाठी शिफारस करतो. ती मिळते तेव्हा संशोधकाचे संशोधन थांबले तरी त्याचा उत्कर्ष चालू होतो. त्याला आणि त्याच्याकडे पाहण्यासाठी इतरांना एक दिव्य दृष्टी प्राप्त होते. त्या पदवीपलीकडे मिळवण्यासारखे असे काही उरत नाही. ती पदवी मिळाल्यावर संशोधकाला कोणीतरी शाल आणि श्रीफळ देतात. तो स्वतः क्रुशन सॉल्ट आणतो आणि भविष्यकाळ चुटक्यामिटक्या वाजवत घालवायच्या तजविजीला लागतो. मराठी साहित्याच्या अंगणप्रांगणात फिलॉसॉफीचे रगड डॉक्टर डुलतडोलवत असतात. त्यांच्या पाक्साळी छच्यासुद्धा त्यांच्या पदवीची नोंदनिशाणी मिरवत असतात. विद्वत्तेने ते नुसते निथळत असतात. त्यांच्या सान्निध्यात मला हीव भरते. हा मी त्यांच्या डबडबलेल्या विद्वत्तेचा रोकडा प्रत्यय समजतो.

मद्रास विद्यापीठाला माझ्यासारखा निर्णायक प्रत्यय येत नसावा. त्यामुळे पीएचडचुच्छू उमेदवारांची अधिक कठोर परीक्षा घ्यायचे विद्यापीठाने ठरवले आहे. प्रबंधसादरकर्त्या पीएचडचुच्छूची आता जाहीर तोंडी परीक्षा

---

वाहत्या कालव्याकाठी बसून राहिला. थोडचा वेळाने त्याने वर डोळे उचलून पाहिले तो सोन्याच्या गलबतातून सोनेरी वस्त्रे ल्यालेली उषा आकाशात उतरत होती. भव्यतेच्या त्या महासागराकडे डोळे भरून पाहताना अभिमन्यूला वाटले मी, माझे प्रेम आणि भोवतीचे आधळे म्हणजे नासलेल्या डबक्यांतले बुडबुडे आहेत.

घराकडे परतण्याऐवजी तो तटाबाहेर पडला आणि भोवतालच्या पर्वतश्रेणीतील पहिला डोंगर चढून वर गेला. सूर्याच्या पहिल्या किरणात हिमाच्छादित शिखरे चकाकत होती. ते अपार सौंदर्य निरखल्याने त्याच्या मनात विचारांची आणि कल्पनांची कारंजी उसळू लागली.

या पर्वतश्रेणींच्या पलीकडे, मैलोगणती अंतर तोडल्यावर त्याचे जग होते. ठठ्ठा... त्याची जन्मभूमी. सौंदर्य आणि संपत्ती यांचे ओघ त्या नगरीच्या पथांतून वाहत होते! राजमहाल, कारंजी, पुतळे, छोटी छोटी घरे...! तिथले बाजार, त्यातला कोलाहल, नाना वेषांची आणि आकारांची माणसे, त्यात मधूनच डोकावणारे आणि स्नेहाचे हास्य करणारे ओळखीचे चेहरे...! त्या शहराबाहेरची नदी!

अभिमन्यू साहसी होता. त्या साहसी वृत्तीनेच या पर्वतमय प्रदेशात शोध करण्याची प्रेरणा त्याला दिली होती. याच साहसी वृत्तीमुळे ठठ्ठ्याजवळून वाहणाऱ्या नदीतून नावेने तो समुद्रापर्यंत गेला होता. तो विशाल सागर आणि तिथून दिसणारे त्याहूनही विशाल आकाश! इथल्यासारखे पर्वतांच्या रांगात कोंडलेले आकाश नव्हे तर दृष्टी पोचेपर्यंत आणि त्याहूनही पलीकडे विस्तारणारे! अगणित पसरलेली ती निळाई आणि त्यात लटकलेले तारे...

अभिमन्यूने पुन्हा एकदा त्या बिकट हास्य करणाऱ्या डोंगरांच्या रांगाकडे पाहिले. त्या पूर्वी इतक्या भीषण त्याला वाटल्या नाहीत. त्याने गावाकडे दृष्टिक्षेप टाकला आणि काही निश्चयाने मान वळवली. साकिनाचा विचार त्याच्या मनात आला... पण ती दूरवरून अंधुक दिसत होती. त्याने पुनः एकदा पर्वतशिखरांकडे पाहिले... सूर्याचे किरण तिथूनच खाली उतरत होते.

काही निश्चयाने तो त्यांच्याकडे पावले टाकू लागला. □

**(एच. जी. वेल्स यांच्या 'द कंट्री ऑफ द ब्लाइंड' या गोष्टीचा अनुवाद.)**

घेण्यात येईल. त्याला पब्लिकला हजर राहता येईल; प्रश्न विचारता येतील; त्याच्या खऱ्या विद्वत्तेला मीटर लावता येईल. आत्तापर्यंत असे नव्हते. प्रबंध तयार व्हायचा. मग पीएचडचुच्छू उमेदवार, त्याचा अंतस्थ मार्गदर्शक, आणि बाह्यस्थ परीक्षक, एकत्र बसून कॉफी प्यायचे आणि चिवड्यातले काजू खायचे. याचा कंटाळा येऊ नये म्हणून मधूनमधून परीक्षक, तुमची जात काय, तुम्ही ब्लेड कोठली वापरता, करुणानिधींची भानगड आहे तरी काय, शिवाजी गणेशनचा नवा चित्रपट कसा आहे, ब्रिटनमध्ये पाण्याची एवढी टंचाई कशी काय हो झाली, मुरुकोबरोबर लोणी चांगले लागते का दही, विमानअपघाताच्या वेळी प्रवाशांचे काय होत असेल, अमेरिकेत जिमी कार्टरच का निवडून आले, असे प्रश्न उमेदवाराला विचारायचे. ते झाले की पीएचडचुच्छूला पीएचडी मिळायची आणि तो कांजीवरम लुंगी चढवून टिमटिम करायचा. अशा परिस्थितीत, त्या पीएचडचूच्छू उमेदवारानेच खरोखर तो संशोधित प्रबंध रचला आहे, हे कळणे अवघड होई. पण आपल्या शिक्षणक्षेत्रात खालपासून वरपर्यंत प्रामाणिकपणा बोकाळलेला असल्यामुळे फारसे काही बिघडत नव्हते.



आता मद्रास विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माल्कम आदिशेषय्या याचा प्रामाणिकपणावरसुद्धा विश्वास राहिला नाहीसे दिसते. किंवा त्यांनी तसे सोंग घेतले असेल, कोणी सांगावे. त्यामुळे आपली विद्वत्ता किती कॅरटची आहे हे शाबित करायची जबाबदारी मद्रास विद्यापीठाने सर्वस्वी त्या बिचाऱ्या पीएचडचुच्छू उमेदवारावर टाकली आहे. बरे, गेल्या काही महिन्यांत लोकांच्या शिस्तप्रेमाला आणि देशभक्तीला नवा कढ आला असल्यामुळे सोपवलेले परीक्षा घ्यायचे काम ते कळकळीने करतील हे उघड आहे. किंबहुना आपल्या सगळ्या राजसामाजिक संस्था लोकाभिमुख होऊ लागल्या आहेत की काय असा संशय येण्यासारखी परिस्थिती देशभर दिसू लागली आहे. मद्रास विद्यापीठाने डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी या मोठ्या पदवीच्या संबंधात केलेली मार्मिक सुधारणा त्या लोकाभिमुखतेची ठळक द्योतक आहे. मद्रासेत झाले ते लौकरच महाराष्ट्रात आणि उभ्याआडव्या भारतात होणार. आपल्या शिक्षणक्षेत्रात सारखे असे व्वाव्वाअहाहाछानछानभलेभले प्रयोग होत असल्यामुळे प्रगतीवाचून आपल्याला मुळी गत्यंतरच उरलेले नाही. त्यामुळे माझ्यासारख्या, मागे मागे राहणाऱ्या माणसाची फार फर्फट होते हो. पण करणार काय; आपलेच बूट, आपलेच पाय. ¤

## □ विक्रमवेडी मुलगी

स्मित वा हास्य ही गोष्ट मोठी अद्भुत आहे. उद्गारवाची शब्दांप्रमाणे जेव्हा ती उत्स्फूर्त असते तेव्हा तिच्याइतकी सुंदर गोष्ट दुसरी असणार नाही. हे जसे तुम्हालामला सहज समजते ना, तसे कित्येकांना समजत नाही. हास्याचे उसने अवसान आणायला त्यांची ना नसते. हास्याचा उपचार ते कर्तव्यपूर्वक आणि काळजीपूर्वक सांभाळतात. उसने वा औपचारिक हास्य ही एक अत्यंत कुरूप गोष्ट आहे, हे त्यांच्या लक्षातच येत नाही. कुरूपतेचे सोडा, उत्स्फूर्त हास्य आणि उसने हास्य या मुळी दोन अगदी वेगळ्या गोष्टी आहेत.

मिशेल गालाचेर या बारा वर्षांच्या अमेरिकन मुलीला तिथल्या अनंतरावाने हे अजून सांगितले नसावे. अरेरे! पाहिलेत, हे असे होते. अनंतरावाच्या सामाजिक उपयुक्ततेचा टिन्नस प्रत्यय अशा एखाद्या प्रसंगी येतो. असो. नायगारा फॉल्स या ठिकाणी राहणाऱ्या छोट्या मिशेलने सकाळी आठ वाजल्यापासून रात्री आठ वाजेपर्यंत एकसारखे अखंड हसत राहायचा विक्रम केला. मग तोंड ठणकत असतानाच, जागतिक विक्रमांची व्यवस्थित नोंद ठेवणाऱ्या गिनेस पुस्तक-प्रकाशनाला तिने पत्र पाठवले. त्या पुस्तकात आपले नाव आणि आपला विक्रम नमूद होऊन आपण अद्वितीय व्यक्तींच्या विरळ कोटीत धप्प जाऊन बसू, असे तिला साहजिकच वाटले. पण गिनेस प्रकाशनाला ते मान्य झाले नाही. तो खरोखरीचा विक्रम आहे की नाही, हे पाहण्याचीसुद्धा तसदी त्यांनी घेतली नाही. कारण स्मितणे आणि हसणे (स्मितणे म्हणजे निःस्वर हसणे आणि हसणे म्हणजे सस्वर स्मितणे) या गोष्टी विक्रम करण्याइतक्या स्वारस्यपूर्ण आहेत, असे गिनेस पुस्तक-प्रकाशनाला वाटत नाही. यावर हसावे की रडावे हेच मिशेलला कळेनासे झाले. पण ते तात्पुरते. मिशेल ही एकूण विक्रमवेडी मुलगी आहे. ती म्हणाली, हसणे जावो सचिवालयात आणि गिनेस जावो मंत्रालयात; आपण आणखी कशाचा तरी विक्रम करू. त्याप्रमाणे आता ती जास्तीत जास्त वेळ चिंगम चघळण्याचा विक्रम करणार आहे. गिनेसना ही गोष्ट स्वारस्यपूर्ण वाटते की नाही, याची मिशेलला पर्वा नाही.

स्मित वा हास्य या गोष्टीला गिनेस प्रकाशन मानत नाही, यामुळे अनेकांना खेद होईल. मला मात्र बरे वाटले. मला सांगा, स्मित वा हास्य या गोष्टीचा विक्रम होणे आणि नोंदणे कसे शक्य आहे? इतक्या उत्स्फूर्त गोष्टीचा विक्रम होऊ शकतो काय? हां, आता उसन्या आणि औपचारिक स्मिताचा वा हास्याचा विक्रम असेल तर गोष्ट वेगळी. त्याला मात्र गिनेसने मान्यता द्यावी, असे मी त्यांना सांगणार. माझे ऐकतील ते.

—अनंतराव

पुस्तके

# कलकत्त्याचं राष्ट्रीय ग्रंथालय

वा. पु. कोल्हटकर
निवृत्त प्रादेशिक ग्रंथपाल, पुणे.

सुमारे १० वर्षांपूर्वीच्या मुंबई राज्यात सरकारी रीतीने कुठेही मुक्तद्वार ग्रंथालय चालू नव्हतं. गेल्या ३० वर्षांतच मुंबईचं 'मध्यवर्ती आणि पुण्याचं महाराष्ट्र प्रादेशिक या राज्यपुरस्कृत मुक्तद्वार म्हणजे मोफत ग्रंथालयानी या नव्या प्रवृत्तीचा प्रारंभ केला.

कलकत्त्यात ही प्रवृत्ती सत्तर वर्षांपूर्वी हिंदुस्थान सरकारच्या पुरस्काराने दिसू लागली. ते ७० वर्षांपूर्वी सुरू झालेले ग्रंथालयीन काम आज प्रचंड रूप घेऊन 'भारताचं राष्ट्रीय ग्रंथालय' या संज्ञेने पुढे चालू आहे.

हा प्रचंडपणा केवढा आहे पाहा. त्या ग्रंथालयाचं ऐसपैस अर्धा ते पाऊण किलोमीटर लांब व पाव किलोमीटर रुंद असं लंबगोल आवार आहे. त्यात ब्रिटिशकालीन राष्ट्रपालांच्या राजवाड्याची सुमारे ६० मीटर्स लांब आणि ४५ मी. रुंद मोजमापाची दुमजली भव्य इमारत आहे. कालक्रमात ती अपुरी वाटू लागल्याने नव्याने नऊ मजली ग्रंथालयीन इमारत जोडूनच बांधली आहे. राजगृहाचं आवार असल्याने उंच उंच वाढलेल्या आणि गर्द छाया देत डुलणाऱ्या वृक्षांच्या रांगा सभोवार आहेत. मधेमधेच केवळ शोभेसाठीच निळ्या–लाल–पांढऱ्या कमळांचे मनोहारी पुंज फुलविणारे, काठावर बसावे असे लहानमोठे तलाव आहेत. वरिष्ठ-कनिष्ठ ग्रंथपाल मंडळी आणि सहकारी यांच्यासाठीच्या जुन्या-नव्या, लहान-मोठ्या, उंच-बैठ्या राहाण्याच्या इमारती आहेत. १४ लक्षांवर ग्रंथ, शिवाय अगणित कालिकं, नकाशे, घडिकं आहेत. त्यांच्या संस्कारांचे, सूचीचे, देवघेवीचे भाग, कचेऱ्यांचे ५० वर विभाग आहेत. असं हे सर्व, पूर्वी कुठेही, कधीही न दिसलेलं ते कुणी पाहिलं तर अचंब्याने उद्गार काढील, 'खरंच हे सगळं कल्पनेपलीकडचं प्रचंड आहे!'

हे प्रचंडपण उण्याअधिक १५० वर्षांमधल्या तीन टप्प्यांनी आलं आहे. याचं बीज पडलं १८३५–३६ मध्ये. दुसरा टप्पा १९०३ चा आणि आजचं रूप देणारा तिसरा टप्पा १९४८ पासूनचा.

१९०३ त लॉर्ड कर्झन ह्या व्हाइसरॉयने १८३६ त स्थापन झालेल्या 'कलकत्ता पब्लिक' ग्रंथालयाला भेट दिली. सगळी कपाटं गच्च भरलेली आणि बहुतेक पुस्तकांची कवचं म्हणजे कव्हरं सुटलेली, फाटलेली, गळलेली हे दृश्य त्याला दिसलं. वाचक कमीच संख्येने येत. त्या एकांत–एकाकी इमारतीत कबुतरांचीच कायम वस्ती होती. कोणी वाचक आलेच तर त्यांच्या आजूबाजूला जोरात गिरक्या मारून ती त्यांना बसण्याची जणू मनाईच करीत. अगदी जवळच समुद्रासारखी हुगळी नदी होती. तीतून चालणाऱ्या आगबोटींचे मंजुळापासून कर्कश म्हणावे असे भोंगे वाचनातून लक्ष उडवीत. ती अवस्था पालटण्यासाठी लॉर्ड कर्झनने कायदा करून ते ग्रंथालय सरकारी केलं. त्याचं नाव 'इंपीरियल' ग्रंथालय ठेवलं. ब्रिटनच्या 'ब्रिटिश मुझियम' ग्रंथालयाप्रमाणे हिंदुस्थानचं हे 'इंपीरियल' ग्रंथालय चालविण्याचं ठरविलं. ब्रिटिश म्युझियममध्ये तयार झालेला मॅक्फर्लेन हा ग्रंथपाल त्यासाठी आणला.

१९४७ त भारत स्वतंत्र झाला. त्यानंतर भारतीय वाङ्मयाची वाढ होणार हे आपल्या नेत्यांनी ओळखलं. इंपीरियल ग्रंथालयाच्या जागेत जो संग्रह जमला होता त्याची गर्दीगचडी झाली होती. त्या वेळेपावेतोच तो संग्रह आणि आगामी अनेक वर्षांमध्ये पडेल ती भर सामावणारी नवी समावेशक जागा, वाढत्या वाचकसंख्येसाठी वाचनगृहं, अभ्यासाला योग्य निवांत आणि आरामाचं वातावरण इत्यादींची तरतूद करणाऱ्या विस्तृत जागेची निवड नेत्यांना दिसली. ह्या विचारांमधेच सर्वप्रथम इंपीरियल ग्रंथालयाचं 'राष्ट्रीय ग्रंथालय' असं नामांतर १९४८ च्या सप्टेंबरात झालं. म्हणजे २८ वर्षे झाली.

ह्या २५ वर्षांपूर्वी पंडित नेहरू, राजगोपालाचारी आणि मौलाना आझाद या दूरदर्शी नेत्यांनी कलकत्त्यातील एका शांत बाजूला 'बेल्वेडियर' म्हणजे 'सुंदर दर्शन' राजवाडा २ लक्ष रु. खर्चून ग्रंथालयीन दृष्टीने सुधारून त्या ग्रंथालयासाठी दिला. आणि पूर्वी इंग्रजीचे प्राध्यापक होते आणि लंडनला ग्रंथपालनाची पदवी घेतलेले बहुभाषी श्री केशवन् या चतुरस्र गृहस्थांना राष्ट्रीय ग्रंथालयाचे शिल्पकार म्हणून निवडलं. त्या ग्रंथालयाची अप्रतिम पायाभरणी आणि विकास यासाठीच जणू केशवन् जन्मले आहेत, असं ग्रंथालयाची वाढ नि व्यवस्था पाहून वाटतं.

श्री. केशवन् यांनी सर्वप्रथम सर्वच ग्रंथालयांना गांजणारा जागेचा प्रश्न सोडवून घेतला. 'बेल्वेडियर' राजवाड्यात ५४०० चौ. मीटरची बांधीव जागा मिळताच जुन्या जागेतला संग्रह तिकडे हलवला आणि तो लावला. ग्रंथालयाचं स्थलांतर ही एक करामतच असते. ती केली आणि 'आणखी जागा हवी' असं दिसताच ९ मजली नवी मारत जोडून बांधविली. भावी पाचपन्नास वर्षे तरी जागेचा प्रश्न येणार नाही. या नव्या संकल्पाच्या ग्रंथालयात भारतातल्या सर्व भाषांमधल्या वाङ्मयाच्या संग्रहाचं सूचीचं आणि संदर्भाचं काम व्हायचं आहे. त्याकरिता भाषाविभागवार अनेक सेवक नियुक्त झाले. त्या क्रमाने वाढलेल्या सेवकसंख्येसाठी बिऱ्हाडांचीही तजवीज नव्या इमारती बांधून केली आहे. त्या सोयींमुळे कलकत्त्यासारख्या दूरच्या अपरिचित महाशहरात ते विविधभाषी सेवक-दूरदूरहून येऊन प्रथमपासूनच प्रस्थापित झाले.

ग्रंथांसाठी उघडी कपाटं म्हणजे शिडाळं भरपूर संख्येची, एक मापाची, एक साचाची, चाकांमुळे सहज सरकवावी आणि सफाई-यंत्राने जलद साफ व्हावी अशा रचनेची खरीदली. ह्या शिडाळांची लांबी २१ किलोमीटर्स होईल! अगणित जुन्या पुस्तकांची जरूर ती ग्रंथसंरक्षक बांधणी करून घेण्यात आली. यासाठी बांधणीचा आणि जंतूनाशन-प्रयोगाचा असे नवे विभागच सुरू केले

आहेत. २० हजारांहून जास्त ग्रंथ मजबूत कवचात सुरक्षित केले गेले आहेत. कित्येक हजारांच्या पुस्तकांच्या जीर्ण पानांना खालती आणि वरती पारदर्शक कागद जडवून म्हणजे 'लॅमिनेशन' क्रियेने ती गलितगात्र पुस्तकं खुटखुटीत बनविली आहेत. लाखांवर पुस्तकं औषधी धुरीने निर्जंतुक केली आहेत. आणि हे निर्जतूकरणाचं काम सततच चालू आहे. अतिदुर्मिळ, पुनर्लभ्य, जराजीर्ण साहित्यासाठी अति सूक्ष्म छायामुद्रणाचं कामही करण्यात येतं.

आज १४ लक्षांवर ग्रंथ तेथे आहेत. त्यामध्ये मासिकादीची बांधीव १ लाख पुस्तकं आहेत. वृत्तपत्रं आणि नकाशेही व्यवस्थेने ठेवलेले आहेत. पुस्तुकली, पावकं, घडिकंही येथे संग्रहित होत आहेत. कारण 'ग्रंथ नोंदणी' कायद्यान्वये भारतभरातून एकूण एक मुद्रित वाङमय तेथे सक्तीने जमा होत आहे. २ लक्षांवर सरकारी प्रकाशनं, यूनो–यूनेस्को–संयुक्त राष्ट्र संघ आणि यूसिस अशा अन्य पश्चिमी प्रदेशांची पुस्तकंही जमा झाली आहेत. चिनी आणि जपानी पुस्तकं देणगीने दाखल झाली आहेत. श्यामाप्रसाद मुकर्जींचे वडील मान्यवर सर आशुतोष मुकर्जी यांचा ८० हजार पुस्तकाचा बहुविषयी; बंगाल्यातील बुहर जहागिरीचा अरबी, उर्दू, फारशी ग्रंथ आणि हस्तलिखितांचा; संस्कृत पंडित डॉ. थिबो यांचा संस्कृताचा; रामदास सेनांचा वंगीय वाङमयाचा; यदुनाथ सरकारांचा इतिहासविषयक; हैदराबादचा असाच जुना; प्रा. व्ही. पिल्यांचा ललित वाङमयाचा असे संरक्षणाच्या संकेताने देणगीचे काही समृद्ध संग्रह येथे आले आहेत.

येथला एकूण संग्रह अतिमहत्त्वाचा असल्याने संग्रहविभागात मुक्त प्रवेश नाही. पण यामुळे त्याची अगणित संदर्भयुक्त सूची केलेली आहे. ग्रंथालयात रोज फार मोठी देवघेव होते. खऱ्या अभ्यासकांची सोयही परगावी पुस्तकं पाठवून केली जाते. अलीकडच्याच एका वर्षात स्थानिक रोज सरासरी हजारांनी आणि वर्षभराने बाहेरच्या सुमारे एक हजारांनी येथल्या सोयीचा लाभ घेतला. ग्रंथालयातून एक लाख पुस्तकं बाहेर नेली गेली. एक लाखांवर वाचनगृहात बसून वाचली गेली. परगावी एक हजारांवर पाठवण्यात आली. परगावाहून येणाऱ्या अभ्यासकांची राहण्याचीही सोय केलेली आहे. ग्रंथालयात येण्यासाठी कलकत्ता शहरातून नवे बस मार्ग सुरू झाले आहेत. अभ्यासकांसाठी, सुमारे चारशे बैठकींची सोय आहे. वेगळं सभागृह ३०० बैठकींचं आहे. ग्रंथालयतज्ज्ञ, लेखनिकी आणि शिपाई वगैरे मिळून सुमारे ६–७ शे सेवक येथल्या सेवेत आहेत. रविवार आणि सुट्टीचे वार वगळता सकाळी ९ ते रात्री ८ आणि रविवारी नि सुट्ट्यांच्या वारी सकाळी १० ते संध्याकाळी ५ ग्रंथालय उघडं असतं. दरवर्षीचा एकूण अर्थसंकल्प सुमारे ४० लक्ष रुपयांचा आहे. त्यात ग्रंथखरेदीसाठी एक लाख संकल्पिले जातात. रोज सवाशे पत्रं येतात आणि त्यांची उत्तर आणि अन्य कामाची मिळून दीडशेवर जातात. भारतातील सर्व ग्रंथांची सूची करण्याचं भव्य संकल्पाचं कामही येथे चाललं आहे.

ह्या तपशिलावरून प्रत्येकाला राष्ट्रीय ग्रंथालयाच्या प्रचंड व्यापाची कल्पना येईल. कलकत्त्यास जाण्याची संधी मिळाली तर ती अफाट विस्तारांची नदी, तिच्यावरचा खांबाशिवाय अधांतरी असणारा हावरा पूल, रामकृष्ण–विवेकानंदांचा बेलूर मठ, नाना प्राण्यांनी शोभणारं प्राणिसंग्रहालय आणि हे प्रचंड अवाढव्य राष्ट्रीय ग्रंथालय प्रत्येकाने पाहिलंच पाहिजे. ◘

---

**SOMETHING BEAUTIFUL FOR GOD**

**BY MALCOLM MUGGERIDGE (Fontana Books, Pages 156, 65 Pence.)**

---

ख्रिश्चन मिशनरी लोकांबाबत आपल्या देशात भरपूर गैरसमज आहेत. थोडचा दिवसांपूर्वी वरील पुस्तक मी पाचेक वाचकांना recommend केलं होतं, तेव्हा या पुस्तकाबद्दल थोडा पूर्वग्रह दिसून आला. आणि असा गैरसमज झाला तर नवल नाही. कारण आतापर्यंत जितक्या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी पोटतिडिकेनं काम केलं आहे, त्यापेक्षा जगात कितीतरी अधिक ख्रिश्चन मिशनरी धर्माचा प्रसार करीत वावरत आहेत. कधी कधी तर CIA चे हेर सुद्धा ख्रिश्चन मिशनरीचा मुखवटा चढवून महत्वाच्या बातम्या गोळा करीत असतात !

मदर टेरेसाच्या बाबतीत तरी कुणालाही असा संदेह नसावा. हे पुस्तक म्हणजे तिचा व तिच्या कार्याचा अल्पसा परिचय. कुणाच्याही मनात तीळमात्र शंका असेल की, मदर टेरेसा धर्मप्रचारासाठी थोडाही प्रयत्न करते त्यांनी मनाची कवाडे उघडी ठेवून हे पुस्तक वाचावे. We must give credit where it is due;

एका लेखकाच्या आगामी पुस्तकाचा उतारा एका नियतकालिकात वाचला. त्यातली एका पात्राची जात अ-महाराष्ट्रीय होती. निव्वळ या कारणामुळे त्या पात्राच्या व्यक्तिमत्त्वाला व स्वभावाच्या जडणघडणेला एक वेगळीच कलाटणी दिली. फक्त जातिभेदावर कुणाच्या व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन करणे हे अभिजात वाङमयनिर्मितीच्या तत्त्वाला सोडून तर आहेच, पण त्याच्यामुळे मनाची काही कवाडे थोडी तरी बंद ठेवल्यासारखे वाटते. म्हणूनच जो खरा अभिजात साहित्यिक व कलाकार आहे, तो कधीच कुणाची जात व गोत्र काढणार नाही.

या पुस्तकातला पान नं. १४४–४५ वरचा मदर टेरेसाचा फोटो फारच लक्ष वेधून घेणारा आहे. हा फोटो पाहिला की, सौंदर्य व कुरूपता, प्रेम व द्वेष, जीवन व मरण, संतपणा व दुष्टता, स्त्री व पुरुष, मनुष्य व प्राणी, यांमधील रेषा किती बारीक व नाजूक आहेत ते प्रकर्षाने जाणवते.

त्यांचं ते दुर्बल शरीर ! पण त्यात किती शक्ती व दांडगा (आत्म) विश्वास ! त्यांच्या चौकोनी हनुवटीतच त्यांचं सारं व्यक्तिमत्त्व बोलकं होतं. नाकही अगदी रोमन ! पण या फोटोत सर्वांत लक्ष वेधून टाकणारे म्हणजे त्यांचे डोळे ! त्या डोळ्यांत नितांत अनुकंपा व अढळ श्रद्धा ! आणखीन एकदा परत आर्थर शॉपेनोरची आठवण येते. शॉपेनोर (सन १७८८–१८६०) या जर्मन तत्त्वज्ञाने कित्येक विद्यापीठांत अभ्यास केला. त्याने भरपूर प्रवासही केला. त्याला 'निराशावादी तत्त्वज्ञ' म्हणतात. सन १८३१ नंतर मात्र तो बहुतेक फ्रँकफर्टम्–मेन येथे अगदी एकटा

राहिला. The world as will and idea व Will in nature., या दोन प्रख्यात पुस्तकांत त्यांनी आपले तत्त्वज्ञान मांडले आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे वास्तवता ही अंधशक्तीप्रमाणे आपल्या will मध्ये असते. आणि माणसात परस्परविरोधी wills मुळे संघर्ष निर्माण होतो. व्यक्तीला आपल्या will च्या मागण्या पुऱ्या करता येत नाही व त्यामुळे मनात वैफल्य व वेदना निर्माण होतात. ही कोंडी फोडण्याचा एक मार्ग म्हणजे आपली Will च शक्यतो Suspend करून will-less state निर्माण करणे. कला, विज्ञान व अनुकंपा यांतसुद्धा कमीजास्त relief मिळतो. यातून मदर टेरेसांनी अनुकंपेचा मार्ग घेतला आहे.

एकदा मदर टेरेसाच्या काहीशा अंधाऱ्या खोलीत थोडे फोटो घेण्यात आले. फोटोग्राफरकडे फ्लॅशगन नसेल किंवा पुरेशा दारंखिडक्या त्या खोलीत नसाव्यात. ते काय असेल ते असो, फोटोच्या रिझल्टच्या बाबतीत त्या फोटोग्राफरला फार काळजी वाटायला लागली. पण फिल्मस् डेव्हलप झाल्या त्या अगदीच ब्राईट !

मगेरीज म्हणतात की, जे लोक इतर लोकांसाठी आपलं सर्व काही वेचून टाकतात, त्यांना स्वतःच्या आयुष्याबद्दल फारसं महत्त्व वाटत नाही. मदर टेरेसा हिंचे बहुतेक सर्व आयुष्य अनाथ मुलांना व अगदी मरणाच्या दारापाशी उभे असलेल्या, रस्त्यावर मरत पडलेल्या लोकांना प्रेम देण्यात व त्यांची शुश्रूषा करण्यात गेले आहे. त्यात त्यांचे स्वतःचे अस्तित्व केव्हाच पुसले गेले आहे. त्या या उपेक्षित लोकांमध्येच जगतात. म्हणजेच शॉपेनोरच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचा अहम् आणि will हे Subjugate, negate झाले. आता त्यांना नियतीच्या क्रूर वास्तवतेची काय झळ लागणार ?

कधी कधी आपल्याला शंका येते की, असला काटेरी मार्ग पत्करण्यामागे दुःखी, कष्टी बालपण, वैफल्य, अवहेलना अशा प्रकारची काही कारणे असतील का ? परंतु मदर टेरेसाचे कुटुंब अगदी सुखी होते. मग तिने एकाएकी का असल्या सुखी कुटुंबाकडे पाठ फिरवली ? कोणत्या तरी शक्तीने तिला अमुक एक कार्य करण्यास निवडले व तिच्याकरवी ते करून घेतले. आपण सर्वच या शक्तीच्या पुढे कळसूत्री बाहुल्या आहोत. त्याच्यापुढे कोणीही कितीही बंड पुकारले तरी ते व्यर्थ तर ठरेलच, पण बंडामुळे आपल्या मात्र चिंधड्या उडतील !

'मी' इतरांसाठी, उपेक्षितांसाठी, संपूर्ण हरवायचा व तो 'मी' आपल्याला न शोधता परत मिळायचा ! आणि तोही कितीतरी पटीने समृद्ध होऊन! त्या 'मी'च्या मनांत नंतर कोणताच हपाप कधीही पेटणार नाही ! मदर टेरेसाला असाच 'मी' परत सापडला आहे. तसे पाहिले तर 'मी' आपण प्रस्थापित व्यवस्थेत सुद्धा हरवतो. त्या प्रस्थापित व्यवस्थेची आपण नीतिमूल्ये स्वीकारतो. आपण conformist होतो. पण इथला 'मी' आपल्याला परत मिळत नाही. इथे रोडावलेला, दुर्बल झालेला, रंक झालेला, 'मी' ही हाती लागत नाही. आणखीन 'मी' ठेवायचा एक मार्ग म्हणजे neurotic बनते! या तिन्ही ठिकाणी तुम्हाला मोठी किंमत मोजावी लागेल. कोणती निवड करायची ते तुमच्यावर अवलंबून आहे. अर्थात तेही परिस्थितीने तुम्हाला निवड करून दिली तर !

टाईम मासिकाने ता.२९-१२-१९७५च्या अंकात मदर टेरेसाची 'कव्हर स्टोरी' केली आहे. टाईमने तिला जगातले जे अगदी थोडे जिवंत संत आहेत त्यांपैकी एक मानले आहे. ही कव्हर स्टोरी मी मगेरीजच्या पुस्तकाला चिकटवून टाकणार आहे. (आमच्या या कात्रणांची पद्धत वाचकांना फारच उपयोगी ठरू पाहत आहे. या पद्धतीमुळे वाचकाला जादा माहिती तर मिळतेच, पण पुस्तकाचे योग्य मूल्यमापन करणे त्याला सोपे जाते.)

१९२२ मध्ये स्कॉपजे, युगोस्लाव्हिया येथे मदर टेरेसा १२ वर्षांची असतानाच तिला गरिबांसाठी काही करावे असे सुचले. परवाच जी. ए. कुलकर्ण्यांचं 'रमलखुणा' वाचलं. त्यात कुठेतरी असे म्हटले आहे की, मृत्यूचा क्षण जसा आधीच ठरलेला असतो, तसाच ज्ञानाचा क्षणही आधीच ठरलेला असतो ! काही लोकांच्या बाबतीत तो येतच नाही ! म्हणजे नियतीनंच आपल्याला कोणत्या क्षणी ज्ञानाच्या क्षणाचा लाभ होणार आहे ते ठरवायचे असते. त्या १२ व्या वर्षापासून मदर टेरेसाच्या मनात कधीही संघर्ष किंवा पश्चात्ताप झाला नाही.

मदर टेरेसा लॉरेटों येथे असताना शिक्षकही होत्या. तो पेशा त्यांना अत्यंत प्रिय होता.

कलकत्ता व मुंबई येथे बरीच जिवंत


**नवीन तयार झालेली काही पुस्तके**

| | |
|---|---|
| १. **तसवीर आणि तकदीर** (आत्मचरित्र) : श्री. के. क्षीरसागर | रु. ४०·०० |
| २. **लालकिल्ल्यातील अभियोगाची कहाणी** : पु. ल. इनामदार | रु. २०·०० |
| ३ **वादळवारा** ('Winds of War'चा अनुवाद–नानासाहेब पेशव्यांची कहाणी)–मनोहर माळगावकर–अनुवादक : भा. द. खेर | रु. १५·०० |
| ४. **'हंस' कथा** (भाग ५ वा)–संपादक : आनंद अंतरकर | रु. १५·०० |
| ५. **अमृताचा डोह** : अ. ल. भागवत | रु. १५·०० |
| 1. **90 Minutes At Entebbe** : William Sterenson | Rs. 18·90 |
| 2. **My Story**–(Autobiography) : Uri Geller | Rs 18·90 |
| 3. **The Riddle Of The Bermuda Triangle**–(Bestseller) Edited by Martin Ebon | Rs. 14·55 |
| 4. **The Brain Revolution** : Marilyn Ferguson | Rs. 21·80 |
| 5. **Bring On The Empty Horses**–(Bestseller) : David Niven | Rs. 18·90 |
| 6. **Something Beautiful for God**–(Bestseller–about Mother Teresa) | Rs. 13·00 |

- **आपणास पाहिजे असलेली पुस्तके आम्ही परगावीही पुरवतो.** (V. P. नाही.)
- **आपल्या पुस्तकांना प्लॅस्टिक कव्हर्स घालून देऊ.**
- **नॉन–मेंबर्सना डेली बेसीसवर पुस्तके वाचावयास मिळतात.**

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**

अर्भकें कचऱ्याच्या पेटीत टाकली जातात ! तिथून ती नगरपालिकेच्या दवाखान्यात किंवा अनाथाश्रमात हलवली जातात. जी अर्भकें मदर टेरेसाच्या ' निर्मल हृदय ' किंवा ' निर्मल निकेतन ' येथे पोहोचतात ती भाग्यवान समजली पाहिजेत. कारण त्यांना तिकडे अन्नपाणी, निवारा तर मिळतोच, पण आणखी एक दुर्लभ वस्तू मिळते; ती म्हणजे प्रेम.

कलकत्त्याला मृत्यूचा वास येतो व मुंबईत पैशाचा वास येतो, इतकी ही शहरे बकाल झाली आहेत. आणि मदर टेरेसांनी कलकत्ता येथे केलेली कामगिरी म्हणजे कठीणातले कठीण दिव्य ! (म्हणजे आपल्याला कठीण— त्यांच्या कामाला त्या दिव्य कधीच मानत नाहीत.)

मी रस्त्यावर मरत असलेल्या माणसांना कितीतरी वेळा पाहिले आहे. सुरुवातीला त्यांना हॉस्पिटलमध्ये पोचवावे असे विचार मनात येतात, पण इतर लोक आपल्याला हसतील. आणि हॉस्पिटलमध्ये तरी त्या मरत असलेल्या माणसाला घेतील का ? (म्हणजे ही प्रस्थापित व्यवस्थाच चुकीची! ) आणि आपल्याला एखाद्या रोगाचे infection लागले तर ? असे अनेक विचार येत व कष्टाने पावले पुढे टाकत आपल्या कामावर निघून जावे लागे. परंतु दर वेळेला माझ्यातला ' मी 'चा तुकडा तुटून पडे. आणि आता तुटायला काही राहिलंच नाही ! आता असा एखादा मनुष्य मरताना पाहिला की, त्याच्या जागी मी तर मरत नाही ना, ही किती सुखद गोष्ट आहे असा आत्मकेंद्रित विचार येतो. थोड्या वेळात परत विचारचक्र सुरू. विज्ञानाची एवढी स्तिमित करणारी झेप. मग मरणाऱ्या मनुष्याची काळजी घेणं, उघड्यानागड्या बालकांना वस्त्र, निवारा देणं हे त्या विज्ञानाला का शक्य नाही ? ' ही प्रस्थापित व्यवस्था इतकी चुकीची आहे तर ती कुणी बदलत का नाही ? का नियतीनंच असा मार्ग आखून ठेवला आहे की, मानवाने नेहमी आडमुठेच वागावे ?

मदर टेरेसा असल्या मरत्या माणसांना टाकून पुढे जाणार नाही. स्वत: एक परदेशी स्त्री असूनही ! भारतात फूटपाथवर मरत असलेल्या आपल्या बांधवांची आपण तेवढ्या पोटतिडिकेनं शुश्रूषा करणार नाही. पण ती जराग्रस्त, दुर्बल बाई असल्या मरत असलेल्या माणसांपुढे भराभर पावले टाकून कधीही जाणार नाही ! कलकत्त्यात अशी कितीतरी माणसे तिने आपल्या निर्मल हृदयामध्ये आणली असेल.

मदर टेरेसा ६६ वर्षांची आहे. अगणित संस्थेने तिचा गौरव केला आहे. जगात जवळजवळ ६७ देशांत तिचे वृद्धाश्रम व अनाथाश्रम आहेत. तिच्या हाताखाली १३०० मिशनरी लोक काम करतात. त्या सर्वांचे हेडक्वार्टर म्हणजे कलकत्ता. पोप व पंतप्रधानांशी गप्पा मारणारी मदर टेरेसा स्वत: toilets साफ करते. मॅगरीजचे फोटो जसे अंधाऱ्या खोलीत एकदम रेखीव प्रकाशाने न्हाऊन निघाल्यासारखे आले त्याचप्रमाणे डॅसमॉंड डॉईंग हा कलकत्त्याचा पत्रकार ' निर्मल हृदय ' येथे गेला असता त्याला एक वेगळाच अनुभव आला. मरत असलेल्या माणसाच्या, ' निर्मल हृदय 'मध्ये विकोपाला गेलेल्या रोग्यांचे हाल, हे सर्व बघून वीट येईल असे त्याला वाटले होते. पण तेथील वातावरण अनुकंपा व करुणा याने इतके काठोकाठ भरले होते की, तो स्वत:च रोग्यांची शुश्रूषा करायला लागला ! डॉईंगनेही मदर टेरेसावर एक पुस्तक लिहिले आहे.

एकदा चौथा पॉप पॉल हिंदुस्थानात आला असता त्याने मदर टेरेसाला पांढरी limousine भेट दिली होती. लगेच ती गाडी तिने लिलावात विकून $ १०००००० नफा काढला होता. अर्थात तो सर्व गोरगरिबांसाठी होता. पण इतर उपयुक्त भेटी ती जपून ठेवते. भारताचा आगगाडीचा व विमानाचा फ्री पास, कलकत्त्याचा ट्रॅम पास वगैरे तिने जपून ठेवले आहे. एकदा १९७३ मध्ये इंपीरियल केमिकल इंडस्ट्रीजने मदर टेरेसाला रंग बनवण्याचा एक जुना कारखानाच देऊन टाकला होता. लगेच तिने तो लहान मुले, वृद्ध व विकोपाला गेलेले रोगी यांच्या निवाऱ्यासाठी त्याचा उपयोग करून घेतला.

मदर टेरेसाच्या आश्रमात मरत असलेल्या हिंदूंना त्यांच्या इच्छेप्रमाणे गंगेचे पाणी ओठाला लावले जाते. म्हणजे ख्रिस्ती धर्म पसरविण्याचा वगैरे कोणताच प्रकार तिथे होत नाही.

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य
या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

॥ मॅक्झिम गॉर्की ॥

। सुमती देवस्थळे ।

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ । पुणे ४११ ०३०



# मल्लिकार्जुन मन्सूर यांचे चिरयौवन

विनय हर्डीकर

चोवीस ऑक्टोबरला, रविवारी दुपारी १२ वाजता, पंडित मल्लिकार्जुन मन्सूर याच्या ' जोगी मत जा 'चे शेवटचे सूर मागेच असलेल्या गर्द निळ्या गालिचावरच्या स्वर–तालांच्या–दीपांच्या प्रतिमाच्या दिशेनं झेपावले, टाळ्याच्या कडकडातच श्रोत्याना अभिवादन करून, सुहास्य मुद्रेनं पंडितजीनी तीन दिवसांच्या संगीत समारोहाची सांगता केली. पण श्रोते आणि सूर याचं इतकं अतूट नातं निर्माण झाल होत की, दोघेही तिथंच रेंगाळत राहिले. स्वरात भिजले होतेच, अश्रूतही भिजले. सद्‌गदित होऊन अनेकजण पडितजीच्या पाया पडले. समवयस्कानी आलिगनं दिली. कित्येक स्त्रिया मर्यादेनं दुरूनच डोळे पुसत होत्या. मल्लिकार्जुनांची नुकतीच काढलेली छायाचित्रं कित्येकांना खिळवून ठेवत होती तर कित्येकजण आपल्या प्रियजनांच्या समवेत तिथंच घुटमळत होते आणि काही केल्या कुणाचेच पाय निघत नव्हते. ' जोगी मत जा 'चा एक नवा, मित्रत्वाचा अनुभव, सौहार्दपूर्ण अर्थ सगळ्याच्या प्रत्ययास येत होता.

जवळजवळ आठवडा होऊन गेल्यावर हे लिहिताना असं वाटतय् की, खरोखरच हे शब्द त्या मूडच्या कुठे जवळपास देखील फिरकू शकत नाहीत. दुसरीही एक जाणीव होते आहे–शब्दांच्या मर्यादांची. त्या तीन दिवसांच्या आठ तासांच्या गाण्यात पंडितजी अठरा राग गायले, नव्हे अठरा स्वतंत्र कलाकृती त्यांनी निर्माण केल्या. त्यांचं वर्णन करताना सुपरलेटिव्हज् न वापरता लिहिणं किती कठीण आहे, किती अवघड आहे आणि त्याच वेळी रसग्रहणाच्या रूढ शब्दसंपत्तीचं भाडार किती अपुरं, थिटं आहे असं सारखं जाणवतं आहे. समीक्षा, रसग्रहण याच्या चौकटीत अगदी श्रेष्ठ कलाविलास बसवणं अवघड असतं, परतु अशक्य नसतं. मात्र साक्षात्कारी पातळीवर, प्रत्यक्ष निर्मितीच्या पातळीवर मन्सूरांनी जो चिरतरुण कलाविलास केला, त्याचं वर्णन रूढ चौकटीत करणं केवळ अशक्य आहे.

या तीन दिवसांच्या संगीत समारोहाचं संयोजनही पुष्कळच योजकता दाखवून करण्यात आलं होतं आणि जवळजवळ तीन महिने अगोदरपासून चार चतुर संयोजक श्रमत होतेच. त्यामुळे कार्यक्रमापूर्वी एक उत्कंठेची हवा सर्वत्र निर्माण झालेली होती. त्यातच श्री. मल्लिकार्जुन यांनी काही अगदी खास, निवडक असे राग आणि रचना ऐकवण्याचं अभिवचन दिलेल होतं, हेही एक उघड गुपित होऊन बसलेल होतं. ऐन तरुणपणी मन्सूर जी भावगीतं, पदं म्हणत तीही पुन्हा अनुभवायला मिळतील, अशीही आशा काहीना होती आणि मल्लिकार्जुनांच गाणं अलीकडे किती झपाट्यानं उत्क्रांत होतं आहे, *absolute art* कडे किती वेगानं धावतं आहे याची जाणीव झालेल्यांनी तर अक्षरशः श्वास रोखून धरलेले होते. एक तपस्वी, जाणकार, व्रतस्थ गायक सकाळ–संध्याकाळ–रात्र गाणार असा योगही सुमारे ४२ वर्षानंतर आला होता. या आधीचा असा कार्यक्रम मंजीखां यांचा झालेला. ते तर मन्सूरांचे गुरूच !

तीन दिवसाच्या कार्यक्रमात श्री. मन्सूर जे राग गायले त्यांतली निवड करण्यातली चतुराई पाहण्यासारखी होती. जयपूर घराण्याचे अगदी खास चढलेले राग हा एक गट. यात बिहागडा, काफीकानडा, संपूर्ण मालकंस, बसंती कानडा, नट, ललिता गौरी, बहादुरी तोडी, शुक्लबिलावल असे अनेक भारदस्त राग ते गायले. जयपूर घराण्याचेच पण त्यातही कमी प्रचलित असे मालवी, मीरा–मल्हार, विहंग असेही राग त्यानी नेटकेपणाने पेश केले. त्यांचा दुसरा गट. तिसरा गट हा जरा कमी प्रचलित, पण ज्याच्यावर केवळ जयपूर गायकीचा हक्क नाही अशा विभास, देस, देसकार, खट अशा रागाचा. आणि हे राग त्यांनी जयपूर ढंगाने नटवले. चौथ्या गटात मात्र त्यांनी तीनच पूर्ण प्रचलित, जरा अधिकच परिचित असे भीमपलास, सारस आणि भैरवी हे राग इतक्या विलक्षण अपारंपरिक पद्धतीने म्हटले की, त्याचे नेहमीचे तोंडवळे सहजासहजी पुसून गेले आणि अत्यंत नवीन रूप घेऊन ते श्रोत्यांना जिंकून गेले.

रागांची ही जी चतुरस्र निवड श्री. मन्सूर यांनी केली त्यात अभ्यास, नवीनता, परंपरेचे पालन आणि परंपरेतच नवीन प्रयोग करण्याची प्रतिभा या सर्व गुणांचा अतिशय उत्कृष्ट असा मिलाफ झाला होता. प्रचलित-अप्रचलित-अतिप्रचलित अशा अनेक रचनांतून जयपूर अंगाने भारतीय शास्त्रीय संगीताचे विशेषत: उत्तर भारतीय शास्त्रीय संगीताचेच जवळजवळ परिपूर्ण दर्शन घडविण्याचे त्यांनी ठरवले असावे. कानडी ढंग या गाण्यात कमी होता. नेहमी ते जी कानडी भजनं म्हणतात त्यांनाही त्यांनी कटाक्षानं दूर ठेवलेलं दिसत होतं.

खास पठडीतले राग मांडताना संक्षेप हे प्रमुख सूत्र त्यांनी डोळ्यापुढे ठेवलं असावं. याच वर्षी जून महिन्यात त्यांची जी मैफल पुण्यात झाली, त्याही वेळी हेच जाणवलं होतं आणि Brevity was the keynote of his recital अशी पावती नुकतीच मुंबईच्या संगीत समीक्षकांनीही दिली होती. सुरुवातीचा बिहागडा सोडला तर सगळे पठडीतले राग त्यांनी जेमतेम २५ मिनिटांच्या वेळात परंतु पूर्णत्वाने मांडले. संपूर्ण मालकंस, बहादुरी तोडी हे राग तर त्यांनी अक्षरश: शेकडो वेळा म्हटले असतील; तेव्हा त्या रागांचं केवळ सारच ( Essence ) ते मांडत होते आणि त्यातही पठडीतला एखादा राग मुख्यत: आलाप अंगानं-दुसरा एखादा लयकारीतून, तर तिसरा एखादा केवळ तान, बोलतान यांच्या चक्रव्यूहातून ते उभा करीत. अनुक्रमे ललिता गौरी, संपूर्ण मालकंस आणि नट, खट यांची मांडणी अभ्यासण्यासारखी होती. बिहागडा जवळजवळ पाऊण तास झाला. तो तर पहिलाच राग होता. सर्व प्रकारचे अंदाज त्यातून घ्यायचे होते. अर्थात ' मोहे जाने दे ' ची उत्कंठेनं वाट पाहणारे माझ्यासारखे श्रोते जरा हळहळलेच. परंतु नंतरचा काफीकानडा द्रुतविलंबित दोन्ही अंगांनी नटवला गेला व ती उणीव भरून निघाली. आपले खास राग म्हणून दीड तास तोडी आणि दोन तास मालंकस असे प्रकार अद्याप लोकप्रिय असताना मन्सूर यांनी दाखवलेला संयम आणि त्यातून आलेली विविधता अनेकांनी घेण्यासारखीच होती. ज्या चीजेत जो प्रमुख भाव असेल, तो मांडून झाल्यावर उगीचच तानांचे सट्टे पिसण्याचा प्रकार त्यांनी केला नाही. ' आज महादेव,' 'प्यारी पग हॅले,' ' डार डार पात,' प्रीतमसैंया, या चिजा मन्सूरांनी नेहमीच्या सरावातल्या असूनही किती उत्कटतेनं मांडल्या !

बिहंग, मालवी, मीरामल्हार हे राग त्यांनी अधिक संक्षेपानं मांडले. कारण असे राग कितीही चमत्कृतिपूर्ण आणि बुद्धी, भावना यांना आकृष्ट करणारे असले तरी मुळात त्यांचा जीव थोडा असतो आणि फुलपाखराच्या पंखाप्रमाणे त्यांचं सौंदर्य असतं. फार घट्ट धरून ठेवलं की सगळा नूर बिघडून जातो. या रागांचं आणि एक वैशिष्ट्य होतं. ते वेगळे असायचे पण कधी परके असे वाटले नाहीत. त्यांच्या अलीकडे-पलीकडे कुठे तरी ओळखीचे सूर असायचे, भाव असायचे. मालवीच्या आसपास सकाळच्या हिंडोलसारखे आणि संध्याकाळच्या श्रीसारखे इतके परिचित स्वरपुंज तरंगत होते की, तो परका वाटायचाच नाही. मन्सूरांनी हा परिचित भाग मोठ्या कौशल्यानं एका ठराविक अंतरावर ठेवला-कधी कधी साथीदार जर त्यातच घुसायची चूक करू लागले तर पंडितजी त्यांना लगेच मालवीत आणून सोडीत. विहंगाचा आविष्कार त्याच्या नावाइतकाच तरल होता-मीरामल्हारमध्ये उत्कटता आणि गांभीर्य यांचा सांधा ' घनसे घनश्याम ' या चीजेच्या बोलांमधूनच जुळून आलेला होता.

श्री. मन्सूर यांनी बिभास, सारंग आणि भीमपलास या रागांच्या मांडणीत अनपेक्षितपणा हे कल्पकतेचं मार्गदर्शक तत्त्व घेतलेलं असावं. बिभास हा भक्तिभावनेला परिपोषक असा राग. ' नरहरि नारायण ' ही चीजही तशीच. मात्र ' मोरारे ' हा द्रुतख्याल लयकारीच्या लपंडावानं, खट्याळ भावनांना अधिक स्थान देऊन,वाव देऊन त्यांनी रंगविला. मुख्य म्हणजे शांत, गंभीर अशा विलंबित आलापांशी द्रुतख्याल कुठेही विसंगत असा वाटला नाही. सारंग हा तसा फार पल्लेदार राग आहे, भल्याभल्यांना तासभर मोहिनी घालणारा आहे आणि संध्याकाळच्या पूरिया-सारखीच एक आर्त, कडवट झाकही त्याच्यात आहे. एकूणच सारंगाचा जम बसायचा, विशेषत: जमलेल्या शुक्लबिलावलनंतर म्हणजे निदान अर्ध्या तासाचा मामला. पण पंडितजींनी निवडलेली चीज इतकी विलक्षण होती ! तिचा तोंडवळाच मुळी उंच सुराचा, भव्य आणि भारदस्त होता. एरवी आलाप अंगानंच सारंग ऐकायला मिळतो, पण इथं होत्या सणसणीत पल्लेदार ताना. अवघड, अडेल अश्वाला अधिक चपळ स्वार जसा काबूत आणतो तसा मल्लिकार्जुन यांनी सारंग जमवला. दहा मिनिटं त्याच्यावर मनसोक्त स्वामित्व गाजवलं आणि त्याला सोडून दिलं. इकडे भीमपलासाच्या बाबतीत उलटाच अनुभव. हा राग तसा हलकाफुलका मानला जातो. अभंग, भावगीत, नाट्यगीतं यांनी तर भीमपलासात केवळ उच्छाद मांडला आहे. असा ' लाइट ' मानलेला राग मल्लिकार्जुन तासभर घेऊन बसले आणि त्यांच्या गळ्यावर जे ग्वाल्हेरी संस्कार आहेत त्यांच्या आठवणीनं रंगवू लागले. भीमपलासाचं इतकं गंभीर आणि संध्यासमयाला अनुकूल असं चित्र मी प्रथमच ऐकत होतो. गंमत म्हणजे पहिल्याच आवर्तनामध्ये श्री. मन्सूरांचा तारषड्ज लागला आणि मग त्यांनी खर्जसाधन, अस्ताई, आलाप, अंतरा, बोलतान, तान व शेवटी ' जा अपने मंदिरवा ' ही द्रुतचीज असा भीमपलास अत्यंत पद्धतशीरपणे ऐकवला. ख्यालगायकीचा विशेषत: मांडणीचा एक सुंदर वस्तुपाठच तो होता. ' सगळं जग भीमपलास गातंय् पण असा भीमपलास व्हायचा नाही ' ही कै. भुर्जीखासाहेब यांचे सुपुत्र श्री. बाबा यांची दाद या भीमपलासानं घेतली नंतर आलेला नट म्हणजे मन्सूरांचा हातखंडा राग परंतु कितीतरी वेळ डोक्यातून भीमपलास जाईना. मी या अनपेक्षित मांडणीत त्यांच्या भैरवीचा उल्लेख केला आहे. भैरवी इतकी चिरपरिचित असते की त्यात काही नवीन ऐकवणं भयंकर कठीण. मन्सूर यांचा भैरवी टप्पा अत्यंत आवेशपूर्ण, जोरदार असा होता, चक्रावून टाकणारा होता परंतु नंतरची ' जोगी मत जा'ची निवड आणि मांडणी इतकी सहजसुंदर होती, उत्कटही होती. Classical आणि Lyrical यांच्या समन्वयानं एक वेगळीच भैरवी उभी राहिली.

ही Classical आणि Lyrical यांची सुंदर एकात्मता हा श्री. मन्सूर यांच्या गाण्याचा सगळ्यात मोठा विशेष आहे असं मला वाटतं. खरं म्हणजे परस्परविरोधी वाटाव्यात अशा या प्रवृत्ती. पण शेक्सपीअरच्या सुनीतात कधीकधी त्या एकत्र भेटतात. मन्सूरांच्या गाण्यात त्या हल्ली फारच जिवा-

भावाच्या सख्या होऊन बसलेल्या आहेत. 'आयो रे मदपिया' ही काफीकानडयाची एक चीज तर दुसरी लगेच 'डार डार पात पात', बिभासाच्या भीमपलासाच्या विलंबित द्रुत स्वरुपातही हाच समन्वय आढळत होता. आपल्या संगीतात विलंबित रचनांमध्ये शृंगार, वीर, हास्य या रसांचा-भावांचा परिपोष व्हावा असा एक संकेत आहे. त्यामागे कदाचित् ही दृष्टी असावी. श्री. मन्सूर हे बहुतेक संकेतानुसार, शिस्तोनुसारच गात होते. ते त्यांचं व्रत आहे परंतु त्यातून निष्पत्ती होई ती ठळकपणे Classical आणि Lyrical अशा कलाकृतीची. 'एरी पियाबिन' 'आणि तम की करा' या चंद्रकंसातल्या चीजा जेव्हा कुमार गंधर्व मांडतात, किंवा 'सखी मन लागेना' आणि 'बोलन लागी कोयलिया' या कलावतीतल्या चीजा गंगूबाई मांडतात तेव्हाही हाच अनुभव येतो. पण पण मल्लिकार्जुनांच्या गाण्यात तो अनुभव ठायी ठायी येत होता. देस गाताना त्यानी 'सुखमे मित्र घने' या शब्दांवर घेतलेल्या मनोहर जागा आठवून पहाव्यात म्हणजे ही दोन elements त्याच्या गाण्यात किती एकरुप झाली आहेत ते जाणवेल.

हा समन्वय ताल, वेळ, साद–प्रतिसाद या सगळ्यांच्या मदतीनं कळसाला पोहोचला तो दुसऱ्या, संध्याकाळच्या मैफलीत मल्लिकार्जुन 'ललितागौरी'मध्ये 'प्रीतम सैंया' ही चीज गायले तेव्हा. पारंपारिक चीज आहे आणि मांडणीचा आराखडाही पुष्कळसा पारंपारिकच होता पण त्यात भरलेला विरहाचा भाव आणि सायंकाळची हुरहुर याची किमया विलक्षण होती. 'दरस दिखा जा, मोरा जिया जाये' हे शब्द मन्सूर विलक्षण आर्ततेने म्हणत होते. सध्या आर्त, विरही भावगीतांचं पीकच येत असतं आणि ती आर्तता कुठे आवाजच लहान मोठा कर, सुस्कारे टाक असं करून व्यक्त करू पाहणाऱ्या तथाकथित भावगीत गायकांनी गिरवून आत्मसात कराव्यात अशा जागा मन्सूर घेत होते. त्यांच्या शिस्तीप्रमाणं आकारातच गात होते. तालाची, रागाची मांडणीची शिस्त पाळून एकेक स्वर असा लावत होते, की तो ऐकताच डोळे पाणावत होते. दोन मध्यम आणि पंचम असा ठळक स्वरसमूह घरून त्यांनी ललितागौरी रंगवला. त्या स्वरांच्या इतर स्वरांच्या अनुषंगानं होणाऱ्या विविध रचनातून विविध भाव निर्माण केले, प्रत्येक श्रोत्याला जणू ती विरहिणी त्यालाच आळविते आहे असा अनुभव दिला, मध्यमावर तर त्यांनी मुक्कामच केला होता–तानेचा वापर अगदी शेवटीच केला होता. ललितागौरीनं इतकी विलक्षण उत्कट दाद घेतली की टाळ्यांचा कडकडाट दोन-अडीच मिनिटं संपला नाही.

श्री. मल्लिकाअर्जुन मन्सूरांच्या गाण्याशी इतके तन्मय झालेले हे श्रोते कोण होते? पुण्यातले जाणकार तर होतेच, पण मुंबई ते कोल्हापूर अशा तीनशे मैलाच्या पट्ट्यातले संगीतप्रेमी एकत्र आले होते. सरकारी अधिकाऱ्यापासून ते खाजगीधंदे (म्हणजे उद्योगधंदे) करणारांपर्यंत लोक होते. मन लावून गाणं ऐकणारी चौदापंधरा वर्षाची मुलं होती आणि हिराबाईंसारख्या सत्तरीतल्या गानतपस्विनी होत्याच. वसंतराव देशपांडे, पु. ल. देशपांडे हे तर विद्यार्थिवृत्तीनं बसून होते. एकदोन मान्यवर अपवाद वगळता पुण्यातले सर्व वयोवृद्ध, लोकप्रिय, होतकरू, अननुभवी गायक–गायिकाही होत्याच. हे दृश्य मोठं सुखवणारं होतं. लेखक, कवी, प्राध्यापक, समीक्षक हे नेहमीप्रमाणे होतेच, पण मनापासून आलेले व भारावलेले दिसत होते. शेवटचा उल्लेख करायचा तो ज्यांची सगळ्यांना काळजी वाटते, त्या तरुणांचा, तेही मोठ्या संख्येनं होते–अर्थात एवढे सगळे असल्यावर काही 'तेवढंच ज्ञानप्रकाशान' या वृत्तीचे लोक असले तरी बिघडत नाही.

पलीकडे निजामुद्दीन, प्रो. राजशेखर, दुसरीकडे श्री. पंचाक्षरी स्वामी आणि आप्पा जळगावकर अशा साथीदारांच्या मध्ये बसलेल्या विलक्षण भावुक डोळ्यांच्या मन्सूरांना पाहणं, कलानिर्मिती करताना पाहणं हा एक अलौकिक आनंद होता. आता त्यांना आठवण्यातही तोच आनंद मिळतो आहे. पंडितजी अत्यंत सुप्रसन्न होते. इतके की नुकतेच काविळीतून उठलेत हे खरे वाटू नये. फार सहजतेने ते गात आणि एखादी सुंदर जागा घेतली की श्रोत्यांबरोबर स्वतःच स्वतःला दाद दिल्यासारखे मनापासून हसत की लगेच दुसरी जागा घेत. त्यांचे सुपुत्र आणि शिष्योत्तम दोघेही साथ करत असताना स्वतः मन्सूर ज्या तन्मयतेनं ऐकत ती तन्मयता त्यांच्या डोळ्यात दिसे. दोघेही साथीदार आपापल्या परीनं चांगलेच गात होते. पण पु. ल. म्हणाले त्याप्रमाणे त्यांची बेरीज काही मन्सूरांच्या इतकी होत नसे. एकदा एकाचा बेसूर लागला तेव्हा मन्सूरांनी विलक्षण अपराधी चेहरा केला होता. दमसास, तानांचे सट्टे, तालाशी झटापट, तारस्वरातलं उत्तुंग अवगाहन चालू असताना मन्सूरांची सहजता कायम असे. त्यांच्यासारखं गायचा नुसता प्रयत्न करणं किती अवघड आहे हे साथीदारांच्या चेहऱ्यावरूनच वाचावं लागे. लयीच्या अंगानं ताना सुरू झाल्या की ऐकणारे घामाघूम होत. बिभास गाताना मन्सूरांनी एकदम तोंड मिटून हुंकारयुक्त अशी तिन्ही सप्तकांना भिडणारी तान घेतली तर अक्षरशः श्वास रोधून ते आश्चर्य श्रोते ऐकत राहिले. साधारणतः दीड तास मन्सूर गायले तर अक्षरशः ऐकणारे चक्रावून जात, दमून जात. श्री. मल्लिकार्जुन स्वतः दमत होतेच, पण त्याचा गायनाला कुठे अटकाव होत नव्हता. मन्सूरांचं हे सगळं गाणं सरावाचं होतं म्हणून इतकं सहज होतं का? अभ्यास गाढा असला की निर्मिती सफाईदार असतेच, पण उत्स्फूर्तपणातही कुठे कमतरता भासत नसे. बर्नार्ड शॉच्या एका उद्‌गारांची आठवण होते, 'मी प्रत्येक भाषणाची तयारी करत असतो आणि प्रत्येक भाषण उत्स्फूर्त होईल याबद्दल जागरूक असतो.' असाच कलाविलास मन्सूर यांनी केला. ते गाण्यात राहायला गेले त्याला पुष्कळ वर्षे झाली, ते राहायला गेल्याचं पु. ल. नी सांगितलं त्याला सुद्धा बरीच वर्षे झाली. पण आता ते त्याहून दूर कुठेतरी गेले आहेत असं जाणवत होतं. असा जो पोचलेला कलावंत असतो त्याची वृत्ती लहान बालकाइतकी खरी, शुद्ध, निर्व्याज असते, बालकाहून अधिक शुद्ध असते, कारण बालकाला अद्याप व्यवहार, लोकप्रियता वगैरेची जाणीवच झालेली नसते. कलावंत मात्र त्या सर्वांवर मात करून जवळ जवळ अग्निपरीक्षा उत्तीर्ण होऊन निर्व्याज, निर्मळ होतो. मल्लिकार्जुन आता तिथं कुठेतरी गेले आहेत. शुद्ध निर्मितीच्या अथांग विश्वात संचार करीत आहेत.

त्यांनी आमच्यात राहण्यापेक्षा तियेच राहावं. पण मधूनमधून आमच्यासाठी गावंही. कारण त्यांच्या गाण्यामधूनच आम्हाला त्या विश्वात डोकावण्याची संधी मिळते आणि आमच्या सुवर्णक्षणांच्या खजिन्यात भर पडते. □

रंगभूमी

### प्रा. तोरडमल यांचं नवं साहस

# गुडबाय् डॉक्टर

शिरीष सहस्रबुद्धे

प्रा. मधुकर तोरडमल यांच्या Anti-romantic आणि Anti-heroic Spirit बद्दल मला नेहमीच आदर आणि अप्रूपही वाटत आलं आहे. नट, नाटककार आणि दिग्दर्शक अशा तीनही भूमिकांमध्ये त्यांनी प्रथम हौशी आणि आता व्यावसायिक रंगभूमीवर मिळवलेलं परस्परपूरक रेखीव झोकदार यश हे त्यांच्याबद्दलच्या आदराचं एक सर्वमान्य कारण आहे. तथापि त्यांच्या वर उल्लेखिलेल्या वृत्तीचं विशेष मला या यशापेक्षाही वाटतं, याला दोन-तीन कारणं आहेत. एक तर हे Spirit त्यांनी फार पूर्वीपासून- खरं तर त्यांच्या उदयकाळापासूनच अगदी आजपर्यंत अबाधित जपलं-जोपासलं आहे. याला धैर्य लागतं. तेंडुलकरांनी 'शांतता कोर्ट...' आणि इतर नाटकांत असं धैर्य दाखवलं. अर्थात वेगळ्या परिस्थितीत. त्यामुळेच वेगळ्या प्रकारचं. तोरडमलांच्या धैर्याची जात वेगळी. त्याचा संबंध प्रक्षोभकतेशी नाही. पण आपली पात्रं संकल्पित conceive- करण्यामागचं दोघांचंही साहस दाद द्यावी असं. लेखाच्या शीर्षकात मी 'साहस' शब्द वापरला तो अशाच दोन-तीन कारणांनी. साहस, धैर्य हे शब्द इथं काहीसे अतिशयोक्तिपूर्ण वाटले तरी त्यांच्या प्रयोगामागच्या विचारपाठचं संदर्भविश्व हे संबंधित नाटककाराचं नसून सामान्य प्रेक्षकांचं आहे. प्रस्थापित सामाजिक नीतिनियमांनुसार गुन्हेगार ठरत असताना ते नीतिनियमच नाकारू पाहणारी 'शांतता कोर्ट...'मधली बंडखोर मिस् बेणारे, किंवा रूढ चौकटीबाहेरचं काही विलक्षण, विकारी पण उत्कट आयुष्य जगणारा सखाराम बाईंडर आणि 'गुडबाय् डॉक्टर'मध्ये तोरडमलांनी उभा केलेला पशुतुल्य विद्वान असे माणसांचे नमुने conceive करणं ही साधी बाब नव्हे, रुळलेली वाट नव्हे. रंगभूमीवर विक्षिप्त पात्रं निर्माण करणं ही यातली कौतुकाची गोष्ट मी मानत नाही. पण निर्माण केलेल्या पात्रांचा अटळ मानलेला विक्षिप्तपणा ज्या प्रामाणिकपणानं, arttist's faith नं ही मंडळी सांभाळतात, पेलतात-तोलतात, त्याचं विशेष वाटतं. एरवी स्वत: लिहिलेल्या 'डॉक्टर'च्या भूमिकेला प्रेक्षकांची धो धो सहानुभूती मिळवणं तोरडमलांना अशक्य नव्हतं; तसा न्याय्य वावही होता. तथापि त्या डॉक्टरमधलं हिंस्र 'जनावरपण' सतत जागतं ठेवून त्यांनी साधलेला कलात्मक तोल प्रशंसनीय आहे. दुसरं असं की तोरडमल काय किंवा तेंडुलकर काय, न रुळलेल्या आडरानी पायवाटेला जातात, ते राजमार्गाचं भान ठेवूनच. पण राजमार्गच 'शॉर्टकट्'न गाठण्याची अभिलाषा ठेवून नव्हे. प्रस्थापितांविरुद्ध बंड पुकारणाऱ्या अनेकांचा अंतिम उद्देश कित्येकदा, इतरांपेक्षा झटपट प्रस्थापितात सामील आणि सुस्थिर होण्याचा असतो. तोरडमलांचं anti-heroic किंवा anti-romantic spirit हे या जातीतलं नसावं. एरवी 'तरुण तुर्क'च्या विक्रमी यशानंतर 'गुडबाय् डॉक्टर'सारख्या धक्कादायक प्रयोगाच्या वाटेला ते गेले नसते.

'ॲन्टी-हिरॉइक / ॲन्टी-रोमँटिक' हे पुनरावृत्त होणारे शब्दप्रयोगही मी मोघम ठेवू इच्छीत नाही. तोरडमलांचा ॲन्टी-रोमँटिसिझम् प्रामुख्यानं आढळतो तो त्यांच्या नाट्यलेखनात, तर त्यांचा ॲन्टी-हिरॉइझम (या दोन शब्दांना समर्पक व समाधानकारक मराठी प्रतिशब्द शोधू न शकल्याबद्दल दिलगीर आहे.) त्यांच्या स्वत:च्या भूमिकांमध्ये डोकावतो. यापलीकडं या दोहोंचं विशेष स्पष्टीकरण देण्याची आवश्यकता वाटत नाही. काळं बेट लाल बत्ती, भोवरा, आश्चर्य नंबर दहा, तरुण तुर्क आणि आता गुड बाय डॉक्टर या त्यांच्या सहज आठवणाऱ्या नाटकांच्या कथाकल्पनांचा आणि कथानकांचा विचार केला तरी त्यातला anti-romanticism ठळकपणे दिसू शकेल. विशेषत: गुड बाय् डॉक्टरमध्ये त्याचं अधिक स्थूल दर्शन घडू शकेल. असाच विचार त्यांच्या भूमिकांच्या बाबतीत केला तर त्यांच्या बहुसंख्य भूमिका काही ना काही प्रमाणात आणि कोणत्या ना कोणत्या मार्गानं तथाकथित heroism च्या प्रस्थापित heroic image च्या बाहेर जाणाऱ्या आहेत, असं लक्षात येईल. अशा image च्या आसपास घुटमळणाऱ्या आणि क्वचितच बाहेर डोकावणाऱ्या डॉ. काशिनाथ घाणेकर, श्रीकांत मोघे, अरुण सरनाईक किंवा नव्यांपैकी विक्रम गोखले, शशिकांत निकते, यशवंत दत्त अशा इतर नायकांशी तुलना केली तर तोरडमलांचं वेगळेपण अधिकच उठून दिसेल. अर्थात अशा तुलनेत, व्यक्तिमत्त्वासारखे अनेक personal factors गुंतलेले असल्यामुळे इथं तरी ती अप्रस्तुत ठरेल अशी शंका मलाही आहे. तथापि तशातही तोरडमलांच्या विषयांचं आणि पात्रांचं वेगळेपण नाकारता येत नाही. या चाकोरीबाहेरच्या, प्रस्थापिताविरुद्धच्या वेगळेपणाचीच उणीव धंदेवाईक नाट्यसृष्टीत आणि त्यापेक्षाही अधिक चित्रसृष्टीत प्रकर्षानं जाणवते आणि मग तोरडमलांचं अप्रूप वाढतं.

गुडबाय् डॉक्टर या 'चंद्रलेखा' निर्मित नव्या तीन अंकी रहस्यप्रधान नाटकात तर जी व्यक्तिरेखा तोरडमलांनी लिहिली आणि उभी केली आहे, तिला जोड ठरावी अशी आव्हानात्मक भूमिका चालू रंगभूमीवर सापडणं दुर्मिळ वाटतं. 'Shakespearean Tragedies'वर प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळविलेल्या आणि तरीही जन्मजात भेसूर रूपामुळे मातीमोल ठरलेल्या एका पशुतुल्य विद्वानाची ही सूडकथा एकाचवेळी भारावून आणि भेडसावूनही टाकणारी. कृष्णा बोरकर या मेक-अप आर्टिस्टच्या मदतीनं तोरडमलांनी काढलेलं या डॉक्टरचं विद्रूप सोंगच

क्षणभर भेदरवणारं आहे. या विद्वान माण-साच्या केवळ पाठीवरच कुबड नाही, त्याच्या अंतरंगातही कुबड आहे आणि अशा अमानुष रंगरूपामुळं जन्मापासून जगाकडून झालेली हेटाळणी आणि एकाकी अवहेलना सोसत जळताना काळचाकभिन्न पाशवी चेहऱ्या-मागचा त्याचा आत्माही जनावराचाच होऊन गेलाय्, तोही सगळ्या जगावरच सूड उगवू पाहणाऱ्या सैतानी मनोगंडानं पछाडलेल्या जनावराचा. एकाकी जिण्याला विटलेल्या या डॉक्टरनं एका अनाथ लहान मुलीला सांभाळलं, वाढवलं आणि ती वयात आल्यावर मात्र आपली अतृप्त नैसर्गिक भूक शमविण्यासाठी तिच्यावर बलात्कार केला. वर्षभर हा छळ सोसून आणि त्या शारीरिक–मानसिक कोंडमाऱ्यातून जन्मलेल्या एका मुलीला डॉक्टरपाशीच सोडून कमल पळाली आणि यथावकाश ती जयंत प्रधान (अरुण सरनाईक) या उमद्या कारखानदाराची पत्नी जयश्री (आशालता) बनली, एका गोड मुलीची आई झाली. तिच्या शोधार्थ हिंडताना त्या शहरात आलेल्या डॉक्टरची (आणि अर्थातच तिचीही) मुलगी दुर्दैवानं तिच्या मोटारीखाली चिरडली गेली. आणि मग, जगण्याचा आधार तुटल्यानं सैरभैर झालेला, आपल्या जुन्या शिकारीच्या शोधानं आसुरी आनंद लाभलेला आणि त्याचवेळी मुलीच्या मृत्यूच्या सूडानं पिसाटलेला डॉक्टर वादळासारखा तिच्या संसारावर कोसळला. पहिला अंक संपतो तो. डॉक्टरच्या हिडीस दर्शनाबरोबर आणि उरलेले दोन अंक चालू राहते ती या दोघांची झुंज–एक प्रचंड बौद्धिक आणि भावनात्मक संघर्ष, तात्त्विक तसाच व्यावहारिकही. नुकसान–भरपाई म्हणून डॉक्टर तिच्याकडे तिची (आणि जयंतची) मुलगी मागतो, आणि ती मागणीही ब्लॅकमेलिंगसकट. तर 'माझ्या संसारावर निखारा ठेवल्यानंतर तरी तुम्हाला सुख लाभणार आहे का?' असा रोकडा सवाल ती टाकते. 'शेवट काय होतो' ही उत्कंठा काही नाटकात लागते तर तो कधी (एकदाचा) होतोय् अशी उत्कंठा काहीत. गुडबाय् डॉक्टरमध्ये मात्र शेवट काय होतो याच्या इतकंच तो कसा होतो यालाही महत्त्व येतं आणि मग 'तीन तास खुर्चीला खिळवून ठेवणारे' वगैरे जाहिरातफेम गुळगुळीत शब्द खरे वाटतात.

लेखक आणि दिग्दर्शक या दोन्ही नात्यांनी तोरडमल यांचं यश जाणवतं ते नाट्य-प्रयोगाच्या रेखीव बंदिस्तपणात. पात्रांची अचूक निवड, मोहन वाघ यांचं उठावदार नेपथ्य, श्रीनिवास खळे यांचं समर्पक, समंजस आणि नाटकाच्या विविध moods मध्ये एकजीव होणारं समर्थ पार्श्वसंगीत आणि प्रकाशाचा सुयोग्य वापर यांच्या साहाय्यानं तीन तास विलक्षण मानसिक दडपण आणणारं रहस्य–भय–उत्कंठामिश्रित वातावरण कायम ठेवण्यात दिग्दर्शक तोरडमलांनी निर्विवाद यश मिळवलंय्. इतकं की त्याखाली लेखनातला काहीसा कच्चेपणा, दे–घडक-सरधोपटपणासारखे दोष झाकून जावेत. डॉक्टरचं पात्र प्रत्यक्षात शेवटच्या दोन अंकांतच वावरत असलं तरी चार अंकांची भरपाई व्हावी इतकी बडबड त्याच्या तोंडी आहे. त्याची अनेक भाषणं, विशेषतः दुसऱ्या अंकातली, बेसुमार पसरट, शब्दबंबाळ आणि जरूरीपेक्षा जास्त self-evident, self-exhibiting व साहजिक कमी प्रभावी झालेली आहेत. हा लेखनदोष मानायचा, अपघात समजायचा की लेखक तोरडमलांनी दिग्दर्शक तोरडमलांची केलेली फसवणूक? अर्थात या भाषणांचं वाङ्मयीन मूल्य हे त्याचं वैशिष्ट्य ठरावं, कारण Shakesperean references, प्रतिध्वनी, अवतरणं यांची त्यात रेलचेल आहे. डॉक्टरचा शेक्सपियरवरचा अधिकार पक्का पटावा इतके संदर्भ हॅम्लेट, मॅक्बेथ, किंग लियर, ऑथेल्लो आणि मर्चंट ऑफ व्हेनिस वगैरे नाटकांतून अचूक उचलण्यात आले आहेत. या नाटकांशी परिचित असणाऱ्या प्रेक्षकांना हा एक सहज अभिजात आनंद उपलब्ध होतो. शेक्सपियरनं आपल्या शोकांतिकांमध्ये समर्थपणे हाताळलेलं comic relief चं तंत्र प्रा. तोरडमल यांनीही मुनीमजी, घरगडी आणि थोड्याफार प्रमाणात जयंत प्रधान या व्यक्तिरेखांच्या द्वारे चांगलं राबवलं आहे. एरवीचा ताण सुसह्य करणं आणि त्याचबरोबर तो अधिक acute, धारदार बनवणं असे दोन्ही उद्देश त्यातून साध्य होतात.

डॉक्टरची मध्यवर्ती व्यक्तिरेखा स्वतः तोरडमल यांनी जीव ओतून उभी केलेली आहे. विशेषतः त्याचे बदलते moods, त्याच्यातल्या जनावराचं शारीरिक माध्यमातलं प्रकटन (–त्याचं चालणं, झुलणं, जमिनीवर झोपणं, जेवणं–यामार्फत), त्याच्या संवेदनक्षमतेचं उग्र आविष्करण (–त्याचा वेड लागण्यात होणारा शेवट–) आणि मुख्यतः त्याच्या धगधगत्या वेदनेतून जन्मलेला उग्र सैतानी सूड या सगळ्या छटांचं त्यांनी घडवलेलं दर्शन झपाटून टाकणारं आहे. मात्र आपल्या संवादफेकीच्या सामर्थ्यावर ते वाजवीपेक्षा जास्त विसंबलेले वाटतात. जयंत प्रधानची आकर्षक व्यक्तिरेखा अरुण सरनाईकनं सफाईनं केली आहे. त्यापलीकडे त्याला वावही नाही. इतर पात्रं आणि मुख्यतः छोटी बेबी सुपर्णा यांच्या भूमिकांची समज उल्लेखनीय. कमल–जयश्री प्रधानच्या भूमिकेत भावदर्शनाला यत्किंचित उण्या न पडलेल्या आशालताबाईंनी संवादफेकीत मात्र निराशा केली. विनाकारण उंच पट्टीत लावलेला स्वर आणि कृत्रिम धाटणी यांच्या जोडीला बाईंनी मराठी उच्चार नुकत्याच लंडनहून परतल्यासारखे का करावेत, हे या रहस्यप्रधान नाटकाबाहेरचं एक रहस्यच आहे ! ◻

---

## मिळाली परी तरी ब्रह्मचारी

### निष्प्राण कथेवर चढविलेले अलंकार

---

काही नाटकात शेवट काय आणि मुख्य म्हणजे कसा होतो यासंबंधी उत्सुकता वाटते तर काहींचा शेवट कधी एकदा होतो अशी उत्कंठा लागलेली असते, असं गुडबाय् डॉक्टरसंबंधी लिहिताना मी म्हटलं होतं. पण यातल्या दुसऱ्या प्रकारात मोडणारं नाटक इतक्या लगेचच पाहावं लागेल असं तेव्हाही वाटलं नव्हतं. श्री. भालचंद्र सुळे-लिखित 'मिळाली परी तरी ब्रह्मचारी' या नाटकानं तो अनुभव नुकताच दिला. घड्याळाकडे नजर टाकत 'बस'ची वाट पाहायला लागावी हे ठीक. पण नाटकाचा शेवट 'फुटायला' सुद्धा घड्याळाकडे पाहत ताटकळावं लागतं, हा फार्सच्या बाबतीतला दुर्मिळच प्रकार म्हटला पाहिजे. खास करून

दुसरा अंक आणि तिसऱ्या अंकाचा काही भाग हा वेळ तर आपण रंगमंदिराऐवजी थर्डक्लास वेटिंगरूममध्ये तर पडलो नाही, याची खात्री करून घेण्यात जातो. मुळात या नाटकाला फार्स, धमाल विनोदी कॉमेडी वगैरे का म्हटलं आहे ते कळत नाही. फार्स म्हटल्यानंतर त्यात काहीही खपेल या लायसेन्सच्या हिशोबानं की काय ? एरवी, नाटक सुरू होण्यापूर्वी दिग्दर्शक-नायक किशोर प्रधान पडद्याबाहेर येऊन जे अनावश्यक, आचरट आणि पोरकट निवेदन करतात, त्याचा अर्थ काय समजायचा ? तो प्रेक्षकांशी संवाद वगैरे साधण्याचा प्रयत्न म्हणावा तर तो सुरुवातीपुरताच मर्यादित राहिला आहे, आणि ती फार्सिकल टच असलेली नाटकाची प्रस्तावना म्हणावी, तर अशी हास्यास्पद प्रस्तावना नसताना न कळण्याइतकं काही हे नाटक अॅब्स्ट्रॅक्ट–अवघड वगैरे नाही. एकंदरीतच, विनोदी 'थीम्' ची भट्टी बिघडली की तिला 'फार्स' म्हणून मोकळं व्हावं असं काहीसं चातुर्य इथं दिसतं—ज्याच्या कविता अजीबात अर्थ निघू देत नाहीत त्या कवीला युगप्रवर्तक ठरवून लोक मोकळे होतात तसं.

**पूर्णिया**

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

कौटुंबिक नाटकासारखी फार्स या नाट्यप्रकाराचीही अशी धर्मशाळा होऊ नये, या प्रामाणिक इच्छेपोटीच ही टीका करावी लागते आहे.

बरं, हा फार्स असल्याचा दावा नजरेआड केला तरी यातल्या नाट्यगुणांचा पत्ता काय? नाटकाच्या कथानकातच कच्च्या दुव्यांना तोटा नाही. आपल्या साहेबांना प्रचंड घाबरणारा एक पी. ए. लग्न करून हनीमूनसाठी म्हैसूरला जातो. तिथेच त्याचा बॉस एस. के. बागूल (दत्ता भट) कामासाठी येऊन थडकतो आणि या जोडप्याची ताटातूट होऊन त्यांच्या हनीमूनचा बोऱ्या वाजतो अशी ही कथा. या पी. ए. सुनील रेगे (किशोर प्रधान) च्या पत्नीनं (जयश्री रेगे–शोभा प्रधान) एस. के. साहेबाला मारलेल्या थापांमुळे ती घरून पळून आलेली आहे असा त्याचा समज होतो आणि संरक्षणासाठी म्हणून तो तिला सतत आपल्या नजरेखाली ठेवतो. या सगळ्या प्रकारातला एकही पटण्याजोगा नाही. रेगेनं साहेबाला घाबरणं ही गोष्ट अतिशयोक्तीमुळे आणि पुनःपुन्हा ताणल्यामुळे विनोदी होण्याऐवजी विदुषकी होते. किशोर प्रधान यांच्या अभिनयाची जोडही ह्याला तशीच मिळते. पुन्हा अशा उग्र साहेबाची व्यक्तिरेखाही अपेक्षाभंग करणारीच आहे. मुळात ही कॅरॅक्टर विनोदी करायची आहे, की गंभीर, का उग्र; लेखक-दिग्दर्शकांचा बुद्धिनिश्चय झालेला दिसत नाही. आहे या स्थितीत ती अकारण खलनायकी वळणावर गेली आहे. दत्ता भटांचा रंगमंचावरील वावर आणि संवादफेकही या समजुतीला पुष्टीच देणारी आहे. बॉसची आक्रमकता आणि या नवरावायकोंचा शेळपटपणा यांच्या परस्परप्रमाणाची भट्टीही उभयतांच्या अतिरेकामुळे फसली आहे. विशेषतः एस. के. साहेबाची भूमिका तर अत्यंत एकसुरी झाली आहे. असाच तोचतोपणा रेगे पतिपत्नीच्या–त्यातही पत्नीच्या—भूमिकांमध्ये अपरिहार्यपणे प्रतिबिंबित झाला आहे.

एवढ्या छापातल्या मूर्ती पुरेशा वाटल्या नाहीत म्हणूनच की काय रेस्टहाऊसचा वेटर कोयल (मुकुंद कोठारे) आणि रेगेचा मित्र कानविंदे (बबन प्रभू) ही दोन पात्रं लेखकानं बहुधा खास विनोदासाठी म्हणून घडवली आणि घुसडली आहेत. वेटरच्या भूमिकेत कोठाऱ्यांनी नाटक असह्य करण्यात मोठा वाटा उचलला आहे. वस्तुतः हा गुणी नट फार्समधला अनुभवी आणि मोलाचा आहे. मात्र 'मिळाली परी'–इतकी भिकार भूमिका त्यांनी इतरत्र कधी कुठे केली असेल का याबाबत मी साशंक आहे. मुळात विनोदनिर्मितीसाठी कानडी वळणानं बोलणारं पात्र वापरायची कल्पनाच कुणी रद्दीत सुद्धा घेणार नाही इतकी जुनाट आणि टाकाऊ आहे. त्यातनं कोठाऱ्यांनी कर्कश बोलणं आणि ठराविक ढंगाच्या हालचाली ('तीन लाखाची गोष्ट' मधलं त्यांचं काम, विशेषतः चालणं आठवावं.) यांच्या मदतीनं ही भूमिका ओढून टाकली आहे. त्यांनी वारंवार लाथ घेण्याचा प्रकार तर विनोदी वाटण्याऐवजी किळस येण्याइतका ताणला आहे. कानविंद्यांच्या व्यक्तिरेखेचा, बबन प्रभूला वाव देण्यापलीकडे कथानकाशी काडीचा संबंध नाही. ओढूनताणून 'कलम' केलेली ही भूमिका बबन प्रभूंनी, दत्ता भटांच्या 'एस. के.' इतक्याच बेपर्वाईनं, casually, साचेबंद आविष्कारपद्धतीनं ठोकून दिली आहे. किशोर-शोभा प्रधान अभिनयाच्या आघाडीवर ठीक. दिग्दर्शक म्हणून किशोर प्रधान यांनी दोन–पाच विनोदी सिच्युएशन्स (दोन खोल्यातलं दार उघडणं, मागच्या खिडकीचा वापर.) बऱ्या सादर केल्या असल्या तरी शेवटी एकदम कौटुंबिक भावनात्मक पातळीवर नाटक नेऊन धक्कादायक पीळ मारला आहे. एकंदरीतच कथेमध्ये जीव नसल्यानं आणि फार्सलेखनाची भट्टी फसल्यानं हे ए–वन् नटसंचातलं नाटक निष्प्राण अंगावर दागिने चढवल्यागत दयनीय झालं आहे. □

# बेबी

## कुरवाळणारे नाटक

### श्री. मा. भावे

रविवार दि. ३ ऑक्टोबर रोजी तेंडूलकरांच्या 'बेबी' या नाटकाचा पुण्यातील पहिला प्रयोग बालगंधर्व रंगमंदिरात करण्यात आला. गाजलेले नाटककार आणि मातब्बर नटसंच यांमुळे रसिक प्रेक्षकांनी प्रेक्षागार भरून गेले होते. तिकिटाचे वाढीव दर देऊन नाटकाला आलेली ही माणसे नाटकाचे सौंदर्य टिपण्यास उत्सुक होती यात शंका नाही. तथापि नाटकाची जसजशी प्रगती होत गेली तसातसा समाधानाऐवजी उद्वेगच काही प्रेक्षकांना तरी वाटत आहे अशी शंका येऊ लागली; आणि अखेरीला जेव्हा माझ्या परिसरातले एक दोन तरुण असमाधानाच्या आरोळचा ठोकू लागले तेव्हा अशा प्रेक्षकांच्या कौलाविषयी खात्री पटली.

'बेबी' या नाटकाविषयी चांगले लिहिण्याजोगे फारसे नाही आणि वाईट लिहिले तर आपण मागासलेले ठरू ही भीती यामुळे कदाचित असेल, बहुतेक धंदेवाईक समीक्षकांनी आपले अभिप्राय बेबीचे कथानक सांगून बनविलेले दिसतात. मला तसे करण्याची जरूर नाही; तथापि एक-दोन वाक्यांत नाटकाची गोष्ट सांगणे वावगे ठरणार नाही. बेबी आणि तिचा भाऊ राघव हे दोघे योगायोगाने आणि समाजाच्या उदासीनतेमुळे शिवाप्पा या क्रूर गुंडाच्या तावडीत सापडतात; शिवाप्पा त्यांच्याशी अतिशय क्रूरपणे वागतो आणि अखेर दोघांनाही हाकलून देतो. ही हकीकत या दोन तासांच्या आणि दोन अंकांच्या नाटकात दाखविली आहे.

'धक्का देते ते चांगले नाटक' असा समज प्रचलित आहे; त्यामुळेही असेल, या नाटकात प्रेक्षकांना धक्का बसेल अशा अपेक्षेने काही गोष्टी टाकण्यात आल्या आहेत. त्यापैकी एक गोष्ट म्हणजे शिवाप्पा बेबीला शृंगारिक आसने (poses) करावयास लावतो. ही पण ही आसने एकापाठोपाठ एक तक्या घाईगर्दीने केली जातात की रंगमंचावरील नटी पाठीत उसण भरल्याने ही हालचाल करते आहे, असा संशय मनात यावा तोच आसन बदलते आणि तिच्या कमरेतही लचक भरली असावी अशी शंका येते. बरे, शिवाप्पाच्या चेहऱ्यावरील परिणामांवरून हे *काय चालले आहे, याचा अंदाज घ्यावा*, तर तो चेहरा इतका विलक्षण रंगविलेला होता की, त्या नटाने काही अभिनय केला असला तरी तो कळणे दुरापास्त.

नाटकाच्या गोष्टीत नाटयाचा परिपोष होईल अशा जागा नाहीत, असे नाही. 'बेबी' शिवाप्पाच्या आश्रयाला का जाते, हे कळले तरी ती त्याच्या आश्रयाने तीन वर्षे का रहाते, हा प्रश्न खोल आहे. नाटकाच्या शेवटी ती शिवाप्पाचा आश्रय स्वतःहून सोडणार असतेच. तिने त्यापूर्वीच तो आश्रय का *सोडला नाही ? ती शिवाप्पावर* पैशासाठी अवलंबून नव्हती. दिवसाला ३५ रुपये मिळवीत होती. शिवाप्पापेक्षा बळकट आश्रय तिला चित्रपटव्यवसायात नक्की मिळाला असता. शिवाप्पाचा खून करविणेही फारसे अवघड होते असे नाही. हे सर्व लक्षात घेता, बेबी शिवाप्पाची रखेली म्हणून का राहिली याची दोन उत्तरे संभवतात. पहिले म्हणजे बेडकाला झडप घालणाऱ्या सापाविषयी वाटते तसे एक विकृत आकर्षण तिला शिवाप्पाच्या क्रूरपणाचे वाटत असावे आणि दुसरे म्हणजे शिवाप्पाविषयी एक पातिव्रत्य भावनाही तिच्या मनात असावी. या प्रश्नाचा असा विचार नाटककाराने केला असता तर नाटकाला निराळी मिती लाभली असती. परंतु क्रूर हास्य आणि भयचकित किंकाळचा यांची अशी काही भुरळ खुद्द नाटककार व दिग्दर्शक यांना पडली असावी की त्यात या प्रश्नाची उकल तर राहोच, पण मांडणी करण्याचेही विसरले गेले आहे.

नाटकातील प्रश्न निर्माण करणारा दुसरा भाग म्हणजे सूर्यकांत फातरफेकर या लेखकाच्या कादंबऱ्यांचे बेबीने स्वतःभोवती उभारलेले कवच. सूर्यकांत फातरफेकर म्हणून कोणी बहुप्रसव कादंबरीकार असतो. त्याच्या कादंबऱ्या चकचकीत पण निरर्थक 'सुभाषितां'नी भरलेल्या असतात. बेबीची बहुतांश जागृतावस्था त्या कादंबऱ्यांच्या वाचनात किंवा चिंतनातच जात असते. तिचे बोलणे कादंबऱ्यांतील गुळमुळीत वाक्यांनीच भरलेले असते. ही सर्व घडण नाटचपूर्ण आहे, यात शंका नाही. शिवाप्पासारख्या गुंडाच्या सहवासात पोळली जाणारी आणि अर्धशिक्षित अशी बेबी अशा काल्पनिक जगाचे चिलखत वापरणार हे पटणारे आहे. त्याचप्रमाणे हे *काल्पनिक जग प्रत्यक्ष जीवनातील* दाहकता कमी करायला तुटपुंजे आहे, हेही खरे. या दोहोतील विसंगती विनोदी ठरावी यालाही आक्षेप घेता येणार नाही. तथापि या विनोदाचा परिणाम बेबी स्वतः हास्यास्पद ठरण्यात झाला, तर तो नाटक लिहिणाऱ्याच्या कौर्याचा भाग म्हणावा लागेल. नाटकात नेमके हेच होते. बेबी जेव्हा सुभाषितवजा निरर्थक वाक्ये बोलत रहाते, तेव्हा तिची कीव येत नाही, हसू येते. कोणी याला नाटककाराचे कसब असेही म्हणतील. मला *स्वत:ला तरी ते औचित्यभंग करणारे वाटते.*

नाटकाला प्रेक्षक जातो, तेव्हा काही एक विशिष्ट मनोवस्था प्राप्त व्हावी, अशी त्याची अपेक्षा असते. लौकिक व्यवहारातील पैसा ही वस्तू नाटकासारख्या अलौकिक व्यवहारात मनुष्य का खर्च करतो, याचे एक उत्तर हे आहे. ही मनोवस्था नाटक जर वर्तमानपत्रातील बातमीसारखे असेल तर त्याला मिळणार नाही. कारण वर्तमानपत्री बातमी ही बातमीचा विषय आणि वाचक यांच्यात काही नातेच जोडू शकत नाही, तो तिचा हेतूही नसतो. त्यामुळे नवीनपणा येवढ्या एकाच निकषावर बातमीचे मूल्य वाढू शकते. नाटकाचे तसे नाही; नाटक निराळ्या विषयावर आहे, एवढ्याने त्याचा दर्जा वाढेल असे नाही. त्याने प्रेक्षक व नाटकातील पात्रे यांच्यात एक प्रौढ नाते निर्माण केले पाहिजे. नाटकातील घटनांच्या संदर्भात विशिष्ट मनःस्थिती निर्माण केली पाहिजे. 'बेबी' हे नाटक पहाताना बेबी व राघव यांच्याविषयी अनुकंपा वाटत नाही, शिवाप्पाविषयी राग येत नाही किंवा बेबीशी जवळीक साधताना शिवाप्पाच्या कक्षेत पाऊल टाकणाऱ्या कर्वेची कीवही येत नाही. ही सर्व पात्रे आपणापासून लांब, रंगमंचावरच राहतात.

आपण कधी कधी मुंग्यांच्या वारुळाविषयी किंवा जंगली श्वापदाविषयी शास्त्रीय लेख

किंवा पुस्तके वाचतो. मुंग्यांशी किंवा श्वापदांशी आपले कोणतेही नाते नसते. तरी ती पुस्तके आणि लेख वाचताना गंमत वाटते, माहिती मिळते. कारण ते लेख अनेक तपशीलांनी भरलेले असतात. मुंग्यांविषयी काही भरघोस माहिती आपल्याला मिळाली आहे, असे समाधान वाटते. आपण आणखी खोल विचार करणारे असू आणि ईश्वरावर विश्वास ठेवीत असू तर त्या जगन्नियंत्याच्या कृतीचे आणि सूक्ष्मतेचे कौतुकही करू. 'बेबी' नाटकापासून हे समाधान तरी आपल्याला मिळते काय ? नाटक अगदीच तुटपुंजे आहे. त्यात तूपशील भरण्याचा काहीही प्रयत्न लेखक-दिग्दर्शकांनी केलेला नाही. बेबी शिवाप्पापाशीच का राहते, शिवाप्पाचे शत्रू तिच्याशी संधान बांधण्याचा प्रयत्न करतात की नाही, शिवाप्पाला बेबीशी विकृत शृंगार करून काय समाधान मिळते इत्यादी प्रश्नांची उत्तरे तर नाटकात मिळत नाहीतच, पण ते प्रश्न उपस्थितही केले जात नाहीत.

'बेबी 'सारखी नाटके धंदेवाईक रंगभूमीवर केली जातात तेव्हा ती 'धंदा' व्हावा या उद्देशाने आणि 'धंदा' होतो असा विश्वास वाटल्याने केली जात असणार हे उघड आहे. हा धंदा कशामुळे होतो ? नाटकाला येणारा बहुतेक प्रेक्षक हा सुखवस्तू समाजातील असतो. नाटकाच्या एका तिकिटात तीन-चार चित्रपट पहाण्यास मिळतात. तेव्हा मर्यादित उत्पन्न असणारा मनुष्य नाटके कशाला पाहील ? 'बेबी' सारखी नाटके झोपडपट्टीतील लोकांसंबंधी असतात. आपण 'तसे' कधीच होणार नाही, असा विश्वास असणाऱ्या प्रेक्षकवर्गाचा अहंकार, त्याच्या दुसऱ्या कोणत्याही भावनांना ताण न देता, ही नाटके कुरवाळतात. म्हणून ही नाटके पहावीशी वाटत असणार.

पाश्चात्य देशात मागास देशातील दारिद्र्य, अज्ञान, लाचलुचपत आणि नैतिक अधःपात यांच्याविषयीच्या बातम्या व फोटो प्रसिद्ध होतात आणि तिकडील लोक त्या चवीने वाचतात, असे ऐकतो. ह्या बातम्या आणि हे फोटो प्रसिद्ध करण्यामागील वृत्ती आणि 'बेबी' सारखी नाटके प्रेक्षकांना दाखविण्यामागील वृत्ती यात जवळचे नाते आहे. त्या बातम्या वाचणारे आणि ही नाटके आवडीने पहाणारे यांच्या वृत्तीतही साम्य आहे, असे मानावे काय ? □



# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २१ | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |

हिंदी चित्रपट । शिरीष सहस्रबुद्धे

सहा भाऊ आणि त्यांचे गणगोत हरवतात त्याची गोष्ट....

# □ फकीरा □ हेराफेरी □ एक से बढ़कर एक

या तीनही चित्रपटांची कथा (चित्रपटांच्या कथा असं मी म्हणू इच्छित नाही.) खरं पाहता मी शीर्षकाच्या ओळीतच सांगून टाकली आहे. तेव्हा लेख एरवी तिथंही संपला असता, कारण एकदा ही 'थीम' कळल्यावर पुढची सर्व डायलॉगसकट पटकथा लहान पोरही म्हणून दाखवील इतकी सर्व-परिचित आहे. पण या तीन चित्रपटांच्या निर्मात्या–दिग्दर्शकांना तब्बल दहा–बारा हजार फूट फिल्म नासूनही जी नीट सांगता आली नाही ती कथा मी एका ओळीत सांगणं थोडं अप्रस्तुतच ठरेल. शिवाय त्यांच्या कथा–पटकथाकारांना काय वाटेल, याचाही थोडा विचार करायला हवा.

वर दिलेलीच कथा सांगणारे हिंदी पिक्चर्स आजपर्यंत कमी होते म्हणून की काय, या त्रिमूर्तीचा अवतार झाला आहे. दोन जुळ्या किंवा लहानमोठ्या भावंडांची लहानपणी गणगोतांसह ताटातूट आणि मोठेपणी अपघातानं भेट हा मामला, 'शिळ्या कढीला ऊत आणणं' या म्हणीला सुद्धा शिळा करणारा असला तरी त्या प्रकाराला सध्या चांगलाच ऊत आलाय् हे मात्र खरं. हे भाऊ जुळे असलेले पूर्वीच्या निर्मात्यांना परवडायचे, कारण त्यातनं आपल्या 'हिरो'ला डबलरोल आणि भरपूर फुटेज् देऊन संतुष्ट राखता येई. सध्याच्या मल्टिस्टारकास्ट जमान्यामध्ये मात्र दोन वेगवेगळे 'स्टार्स' घेणं सुरक्षित झालेलं असल्यानं भावंडंही लहानमोठी ठेवण्याकडे कटाक्ष असतो. फकीरामध्ये शशीकपूर आणि डॅनी डेंग्जोपा, हेराफेरीमध्ये अमिताभ बच्चन आणि विनोद खन्ना व एक से बढ़कर एकमध्ये अशोककुमार–राजकुमार यांनी या वाट चुकलेल्या ले (को)करांच्या भूमिका पार पाडल्या आहेत. एवढ्या मातब्बर मंडळीत थोडाफार अभिनय करण्याची संधी विनोद खन्नाला मिळालीय् आणि त्यानंही ती बऱ्यापैकी राबवलीय्. एरवी भूमिकांचा साचा झाल्यामुळे त्या करण्याची स्टाईल निर्माण झाली आहे. डॅनी, अमिताभ आणि राजकुमार या तिघांचा निर्देश अशा आपापल्या स्टाइल्सचे बळी म्हणून करता येईल. संवादांच्या नखरेल आणि ठसकेबाज फेकीवर तिघांचाही भरवसा बराच असतो. तथापि अगदी त्यांच्या चाहत्यांना तरी आनंद मिळेल एवढाही फेकाफेकीचा चान्स त्यांना मिळालेला दिसत नाही. बाकी अभिनय तिघांनीही आपल्या ठरीव शैलीनंच केला आहे. अमिताभची भूमिका ही बरीचशी 'जंजीर' छाप आहे आणि त्यानंही जंजीरपेक्षा जास्त काही करण्याचा प्रयत्न केलेला नाही. डॅनीनं बराचसा भर उग्र आणि आक्रस्ताळी व्यक्तित्व उभा करण्यावरच दिलेला आहे. एखादं वाक्य वारंवार repeat करण्याची ढब त्याच्या विशेष आवडीची दिसते. आजपर्यंत चोर मचाये शोर आणि दुसऱ्या एका चित्रपटात 'तेरी माँ को अपनी माँ कहूँगा' आणि 'कसम ईमान की' अशी पालुपदं घोळवून झाल्यानंतर फकीरामध्ये त्यानं 'कसम पैदा करनेवाले की' असा जजवाती डायलॉग उचलला (आणि वारंवार फेकला–भिरकावला)आहे. राजकुमारजींनी 'वक्त'-मधल्यासारखाच रुबाब ताणला असला तरी तसा आब आलेला नाही. अशोककुमार या सद्‌गृहस्थाबद्दल काय लिहावं हेच कळत नाही. एक से बढ़कर एक मधली त्यांची देमार छाप बदमाशाची भूमिका पाहिल्यानंतर वयाच्या पासष्टाव्या वर्षी असले चाळे सुरू केल्याबद्दल त्याला दूषणं द्यावीत की, त्याच्या या वयातल्या डॅशिंग हिरवटपणाची दाद द्यावी, हे ज्याचं त्यानंच ठरवावं. एक मात्र नक्की की, 'शंकरदादा'नंतर अशोककुमारनं कंबर आणि अन्यान्य अवयव लचकवून कव्वाली म्हणण्याची फॅशन निर्माण होत असेल, तर दादामुनींनी स्वतःच्या नाही तरी प्रेक्षकांच्या हृदयाची कीव करावी आणि हे आचरट हिडीस प्रकार तत्काळ बंद करावेत. खरं तर त्यांनी निवडक चित्रपटांतल्या मोजक्या आणि दर्जेदार भूमिका करण्यातच सर्वांचंच हित आहे. कव्वालीवर अदा करण्याचा सर्वांगसुंदर व्यायाम करू शकतील असे अनेकजण सापडतील, अशोककुमार मात्र एकच आहे–राहील.

व्हिक्टोरिया २०३ आणि चोरी मेरा काम या गाजलेल्या चित्रांचे निर्माते ब्रिज यांनी एक से बढ़कर एक मध्ये निरनिराळ्या इंग्रजी चित्रपटांवरून बेतलेली एक रत्न-चोरीची कहाणी, इन्स्पेक्टर नवीन निश्चल व शर्मिला टागोर यांच्या प्रेमाचं अस्तर लावून पेश केली आहे, तर स्मगलर्स, काळाबाजारवाले वगैरे समाजकंटकांवर चित्रपट काढण्याच्या नव्या लाटेवरच फकीरा व हेराफेरी तरंगणारे आहेत. या दोन्हींमध्ये अशा ठकमंडळींचं चित्रणच इतकं प्रभावी आणि आकर्षक आहे की, हे चित्रपट त्यांचा पाडाव दाखविण्याऐवजी प्रचार करण्यासाठीच काढलेले असल्याचा संशय यायचा. फकीरामध्ये शबाना आझमीची नव्या धर्तीची भूमिका आणि रवींद्र जैनचं विलोभनीय संगीत एवढी तरी जमेची बाजू आहे; तर हेराफेरीमध्ये सायराबानूनं 'नहले पे देहला'च repeat केला आहे. अर्थात हेराफेरी हा चित्रपटच नहले पे देहलाचा लहानपणी दुरावलेला जुळा भाऊ आहे, असं ऐकतो. साहाय्यक भूमिकांमध्ये सुलक्षणा पंडित (हेराफेरी), अरुणा इराणी (फकीरा), देवेन वर्मा (एक से बढ़कर एक), असरानी (फकीरा) या मंडळींनी बऱ्यापैकी कामगिरी केली आहे. फकीरा वगळता संगीताचा बाजा(च) वाजला आहे. एकंदरीत, उडदामाजी काळे-गोरे निवडायचेच, तर फकीरा बराच सुसह्य आहे, एरवी तीनही चित्रपट एक से बढ़कर एक बोअर करतात. □

टीप : हेराफेरीमधले अमिताभ–विनोद हे प्रत्यक्ष भाऊ-भाऊ नसून मित्रच असल्याचं हा लेख लिहिला गेल्यावर माझ्या एका मित्रानं लक्षात आणून दिलं. यावरून अर्थात, असे चित्रपटही शेवटपर्यंत डोकं ताळ्यावर ठेवून बघू शकणारे धैर्यवान लोक जगात असतात एवढंच सिद्ध होतं. अमिताभ–विनोदच्या बाबतीत म्हणाल तर त्यामुळे काय फरक पडतो, नाही का? बोलूनचालून ती पडली हिंदी सिनेमाची कथा !

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### १३।११।७६ ते १९।११।७६

**मेष : पैशाची काळजी संपेल**

राशिस्वामी मंगळ तुमच्यावर सध्या खूष आहे. तसेच अंतरिक्षातिल अनेक समर्थ ग्रह तुमच्या पाठीशी उभे आहेत. त्यामुळे हा आठवडा अनेक बाजूनी प्रोत्साहक ठरणार आहे. मानसिक स्वास्थ्य उत्तमपैकी लाभणार असून जे जे काही करायचे ठरवाल त्याला उत्तम प्रतिसाद मिळणार आहे. गेले काही दिवस राहू-हर्षलाने विस्कटून टाकलेले तुमचे आर्थिक जीवन सुस्थितीत येऊ लागणार आहे. लॉटरी अगर रेसच्या यशाचे भागीदार काही भाग्यवान ठरतील तर जमिनीच्या व्यवहारांत काही फायद्याचे अनेकजण राजे ठरतील. यावेळी तुम्हाला पैशाची अडचण म्हणून पडणार नाही. नोकरीत वरिष्ठांच्या तंत्राने वागल्यास खूपच फायदा होऊ शकेल. शुभ दिनांक १५–१६

**महिलांना** : स्वतंत्र धंद्याचे स्वप्न साकार होईल. पैशाची बचत होईल.

**विद्यार्थ्यांना** : कलावंताचा सहवास उपकारक ठरणार आहे.

**वृषभ : अडचणीतून मार्ग**

अंतरिक्षप्रिय रवि–मंगळासारखे तुल्यबळ ग्रह चंद्रासमोर तळ ठेवून बसले आहेत. याचा अर्थ पराकाष्ठेच्या प्रयत्नांची गरज आहे हे स्पष्ट आहे. मात्र राशीतच सध्या गुरू आहे. त्यामुळे प्रयत्नाने का होईना यश पदरात पडणार आहे. धंदा–व्यवसाय सुधारेल. तो सुधारण्यासाठी जी पावले उचलाल ती अचूक ठरतील. आर्थिक ताण अजून काही काळ तरी सहन करावा लागणार आहे. परंतु पैसे मिळण्यात मात्र अडचणी नाहीत. सामान्यतः कर्ज वा व्यवसायाच्या उत्कर्षासाठी पैसे मिळवण्याच्या योजना यशस्वी होतील. आरोग्याची मात्र काळजी घ्या. शुभ दिनांक १४–१६

**महिलांना** : नोकरीत अधिकारपदाचा लाभ होईल.

**विद्यार्थ्यांना** : अभिनयकलेचा अभ्यास करा.

**मिथुन : प्रगतीची चाहूल**

बौद्धिक क्षेत्रांत तुम्हाला मोठे स्थान प्राप्त होणार आहे. गुरु बारावा असला तरी तो तुमचे कोणतेच अहित करणार नाही. लेखनाचा गाडा थोडा फार रेंगाळत चालणार आहे. पण लोकांना दिलेली आश्वासने पुरी करू शकाल. नोकरीधंद्याची परिस्थिती फार मोठी उत्साहवर्धक आहे असे काही. तरी पण आहे त्या परिस्थितीत थोडी अनुकूल सुधारणा दिसेल वरिष्ठांच्या मनांत जर काही किल्मिष असेल तर ते दूर होईल. पुन्हा नव्या उमेदीने कामाला लागू शकाल. खर्चावर बंधन ठेवावे लागेल. रोजचा खर्च भागेल, पण बचतीची अपेक्षा मात्र फोल ठरणार आहे. शुभ दिनांक १५–१७

**महिलांना** : सार्वत्रिक उत्साह व काही मनासारखे घडवणारा हा आठवडा आहे.

**विद्यार्थ्यांना** : बुद्धी चांगले काम देईल, यश मिळेल.

**कर्क : यशाची चढती कमान**

राशीत शनी, पंचमात रवी-मंगळ ही एकच असामान्य अशी ग्रहस्थाने आहेत की त्यामुळे यशाचे सुवर्णकण हाती येणार आहेत. धंदा-व्यवसाय, व्यापार, प्रवास, नोकरी इत्यादी सर्व क्षेत्रांत तुमच्या कर्तृत्वाचे सादपडसाद उमटणार आहेत. नोकरीत गुणांना संधी व वाव मिळण्यासारखे काम तुमच्या वाटचाला येईल. सहकार्य मिळेल. व्यापारधंद्यातील मंदी दूर होऊ नवे काही घडवू शकाल. शेतीची अवजारे, खते यासारख्या व्यापारी वस्तू तेजीत येतील. नोकरीत बदल मात्र करू नका. राजकीय क्षेत्रांत तुमच्याबाबतीत काही अपेक्षा पूर्ण करणारे घडेल. शेअर्ससंबंधी अंदाज अचूक उतरतील. आरोग्य उत्साहवर्धक राहील. शुभ दिनांक १४–१७

**महिलांना** : साडेसाती आहे याची जाणीव ठेवून धंद्यात श्रमाचे जास्त धाडस करू नका.

**विद्यार्थ्यांना** : क्रीडाक्षेत्रात प्रयत्नाला मोठे यश मिळेल.

**सिंह : सुखाला गालबोट**

राशिस्वामी रवी वृश्चिकेसारख्या औपचारिक पण प्रशासकीय राशीत आहे मंगळ हा देखील पाचवा व स्वतःच्या राशीत आहे. त्यामुळे अनुकूल व उपकारक अशी ग्रहपरिस्थिती आहे. अनेक लोकांनी तुमच्याविरुद्ध गेले काही दिवस चालवलेल्या कारवाया आता पूर्ण थंडावल्या आहेत. विरोधकांना अहिंसक मार्गाने खतम करण्यात तुम्ही मोठे यश संपादन केले आहे. आता हे विरोधक हताश होऊन तुमच्यापुढे हात टेकतील. नोकरीच्या बाबतीत त्रास संपलेला आहे. उलट वरिष्ठांच्या मर्जीचा प्रसाद आता तुमच्या पदरात पडणार आहे. बेकाराचे दुःख समूळ नष्ट झाले नाही तरी काही प्रमाणात ते कमी मात्र होणार आहे. शुभ दि. १३-१४

**महिलांना** : अडचणी संपल्या असून प्रगतीचे नवे पर्व सुरू होईल.

**विद्यार्थ्यांना** : शिक्षणातील खंड भरून निघेल.

**कन्या : अनुकूलता आहे**

कन्या राशीच्या व्यक्तींना हा आठवडा तसा प्रतिकूल नाही. परंतु संकटे व अडचणी या दोन काट्यांतून मार्ग काढीतच तुम्हा व्यक्तींना मार्गक्रमण करावे लागते. हा आठवडा तसाच जाणार आहे. आर्थिक परिस्थितीत काही अंशी सुधारणा होईल. जुने येणे वसूल होईल. दुय्यम व्यवसायात लोकांची तुमच्याकडून जी कामे झाली असतील त्याचा मोबदला तुम्हाला यावेळी मिळणार आहे. नातेवाईक व इष्टमित्र यांच्याबरोबर पत्रव्यवहार होऊन अपेक्षित हेतू पूर्ण होतील. *नव्या स्वतंत्र धंद्याची योजना आखू शकाल* अनेकांचे सहकार्य मिळेल. नोकरीत वरिष्ठांच्या मर्जीचा प्रत्यय येईल. मात्र स्वास्थ्य व आरोग्य या बाबतीत अपेक्षित समाधान मिळणार नाही. शुभ दिनांक १५–१७

**महिलांना** : अनारोग्याच्या अडचणी कमी होतील. शीण व थकवाही कमी होईल.

**विद्यार्थ्यांना** : मनस्ताप करून घेण्याची सवय टाळा.

## तूळ : प्रतिष्ठा वाढेल

तुमच्या उत्कर्षाची व प्रगतीची एकूण सूत्रे शनीच्याच हाती आहेत. त्यामुळे त्याच्या हातून अनेक भविष्यकालीन योजनांचे सूतोवाच यावेळी होईल. खूप दिवस जो धंदा तुम्ही उभारण्याचा विचार करीत होता तो धंदा यावेळी सुरू होणार असून अपेक्षित सहकार्य-देखील मिळणार आहे. व्यापारीवर्गाने जुन्या समजुती दूर सारून कापडधंद्यांत अधिक लक्ष घालावे. शेतीचा व्यवसाय नव्याने सुरू करावयास हरकत नाही. जमिनीचा प्रश्न सुटणार आहे. गायक-वादक, आकाशवाणी-कलाकार यांचे मनोरथ पूर्ण होतील. नोकरीच्या दृष्टीने लाभदायक घटना घडतील. प्रतिष्ठा उंचावेल. अधिकाराचा लाभ होईल. शुभ दिनांक १७–१८

**महिलांना :** सार्वजनिक कामात सन्मान होईल. मानाचा योग आहे.

**विद्यार्थ्यांना :** गायनाचा अभ्यास करा. यश चालत येईल.

## वृश्चिक : अपेक्षा पुऱ्या होतील

राहू व हर्शलाने तुमचे आर्थिक स्थैर्य जरी खिळखिळे करण्याचा प्रयत्न चालवला असला तरी राशीतच वास्तव्य करून असलेले रवि-मंगळ समर्थपणे त्यांचा डाव उधळून लावणार आहेत. त्यांचे डावपेच यशस्वी होणार नाहीत. तुमच्यापैकी जे कोणी बेकार असतील किंवा नजिकच्या काळात अशी टांगती तलवार तुमच्या डोक्यावर येण्याची शक्यता आहे, त्यांना रवी, मंगळामुळे अशी भीती व्यर्थ असल्याचा प्रत्यय येईल. निवृत्तीच्या वाटेवर असलेल्यांना भत्तावाढ मिळेल. चालू नोकरीत तुम्ही जर कुणी अधिकारी असाल तर कोणताही निर्णय वरिष्ठांच्याच सल्ल्याने घ्या. मालकांची व उच्चपदस्थांची मर्जी राहील. आर्थिक परिस्थिती अस्थिर राहणार असली तरी गरजेपुरता पैसा मिळेल. अपेक्षा पुऱ्या होतील. शुभ दिनांक १४–१७

**महिलांना :** अनेक महत्त्वाच्या घटना व्यावसायिक जीवनात घडतील.

**विद्यार्थ्यांना :** स्वभाव जास्तीत जास्त तापट बनणार आहे, त्याला आळा घाला.

## धनू : कोंडी होणार आहे

गेल्या काही दिवसांत शनीबरोबर रवी-मंगळ अशा ग्रहांच्या युत्या आठव्या स्थानी होऊन गेल्या आहेत. या ग्रहांनी संकटाच्या–अपेक्षाभंगाच्या काठावर तुम्हाला नेऊन ठेवले आहे. पण व्ययस्थानी रवी-मंगळांनी तुमची कोंडी करायचे ठरवले आहे. अर्थात तुम्ही त्यामुळे घाबरून जाण्याचे मुळीच कारण नाही. काही त्रास होईल, नुकसान होईल, अशी केवळ भीती वाटण्यापलीकडे प्रत्यक्षात तुमचे कोणतेच नुकसान होणार नाही. नोकरीत बदल करण्याची गरज नाही व इतकेही करून असा बदल आवश्यक वाटत असेल तरी हा विचार पुढे ढकलणे श्रेयस्कर होईल. धंद्यात भागीदारी नको. उपासना व अध्यात्माच्या क्षेत्रांत तुमची वृत्ती जास्त रमेल. आर्थिक बाजू बळकट होण्याला अजून बराच काळ लागेल. परदेशी जाण्याचा योग आहे. शुभ दिनांक १५–१६.

**महिलांना :** मंगलकार्यात पुढाकार मिळेल. नोकरीत समाधान मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** संशोधनात लक्ष घाला. कलांचाही अभ्यास करा.

## मकर : आर्थिक लाभ

अंतरिक्षातील समर्थ ग्रह अनुकूल झाले की, नशीब स्वप्नांनी बहरते तर आशा-आकांक्षा फुलून येतात. मंगळ हा मकर राशीचा हितकर्ता ग्रह आहे तर रवी हा राजकीय प्रतिष्ठा आहे. हे दोन्ही ग्रह सध्या अकरावे आहेत, ही मकर राशीच्या वैभवशाली भाग्याचीच ग्वाही होय. यावेळी जे जे कराल ते ते यश मिळवून देणार आहे. तुमच्यापैकी ज्यांना रेस व लॉटरीचा नाद आहे त्यांनी यावेळी आवश्य भाग घ्यावा. नशीब उजळून जाईल. व्यापारात कोणतेही नवे धाडस करा. इंजिनीयरिंग, उद्योग, खते यांचा धंदा तेजीत येईल. स्वतंत्र कोणताही धंदा यश मिळवून देईल. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. वरिष्ठांची मर्जी राहील. शुभ दिनांक १४–१५.

**महिलांना :** तुम्ही स्वतंत्र धंदा सुरू करू शकता. मालक होण्याची संधी आहे.

**विद्यार्थ्यांना :** केलेल्या श्रमाचे चीज होईल.

## कुंभ : राजकारणात यश

राजकारणात आघाडीवर असलेली तुमची रास आहे. तुमच्यापैकी जर कुणी यावेळी सार्वजनिक कामात, राजकारणात भाग घेणार असेल तर त्याला चांगलीच लोकप्रियता लाभणार आहे. आर्थिक बाजू भक्कम होण्यासारखी परिस्थिती निर्माण होईल. केलेल्या कोणत्याही कामाचे योग्य चीज होऊन चार पैसे पदरात पडतील. परदेशगमन, देशात प्रवास असे देखील घडू शकेल. नोकरीत अधिकारयोग आहे. चालू अधिकारात निश्चित वाढ होणार आहे. नोकरीत बदल हवा असेल तर त्याला अनुकूलता आहे. आपल्या मागण्या मांडू शकाल. सरकारी नोकरीत जबाबदारी वाढणार आहे. तब्येत बरीच उत्साहाची राहील. अपेक्षापूर्तीचा आनंद मिळू शकेल. शुभ दिनांक १६–१८.

**महिलांना :** नोकरीत वरचष्मा राहील. स्वप्ने साकार होतील.

**विद्यार्थ्यांना :** कलाक्षेत्रात प्रसिद्धी मिळेल.

## मीन : प्रवास घडेल

मित्रहो, तुमच्यापैकी जे कुणी लेखक, प्रकाशक, पत्रकार असतील त्यांना यावेळी सरकारी खर्चाने प्रवास घडण्याची शक्यता आहे. अनेकांना नवी प्रेरणा व स्फूर्ती मिळेल. सर्वसाधारण हा आठवडा अनुकूल आहे. व्यापार-उदीम व्यवस्थित चालेल. नोकरीतील अडचणी कमी होतील. खाष्ट व्यक्ती बदलून जाऊन तुमचे क्षेत्र व्यापक होईल. अभिजात गुणांना वाव मिळेल. आजवर जी संधी मिळत नव्हती ती अचानक मिळेल. स्थावराचा प्रश्न सहजपणे सुटेल. वारसाहक्काने घर अगर स्थावराची प्राप्ती होईल. यावेळी स्त्रीकडून काही तरी प्राप्ती होण्याचा योग आहे. तब्येतीची मात्र काळजी घ्या. वाहन हळू हाका. नवे वाहन खरेदी करू शकाल. शुभ दिनांक १६–१७.


**महिलांना :** माहेरवास वा इतर ठिकाणी प्रवास होईल.

**विद्यार्थ्यांना :** मनासारखे नवे वाहन मिळेल.

□

MANOOS (Weekly) 60 Paise Regd. No. PNC-68


# प्रसिद्ध झाले ।



## लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी
## १९४८-४९

लेखक : पु. ल. इनामदार

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०